कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

## कोकण आयुक्तपदी राजेश देशमुख

**रायगड :** कोकण विभागीय आयुक्तपदी राजेश देशमुख यांची बदली झाली आहे. त्यामुळे आता कोकण विभागाला पूर्ण वेळ आयुक्त लाभला आहे. राजेश देशमुख हे याआधी आयुक्त, क्रीडा व सेवा या पदावर कार्यरत होते. सध्याच्या पदाचा कार्यभार क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून नवीन पदाचा कार्यभार विकास पानसरे यांच्याकडून त्वरित स्वीकारवा, असे अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

## आज पेझारीत महिलांचा संवाद मेळावा

**अलिबाग :** रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची अंतर्गत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने महिला संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील भैरवनाथ मंडळ पेझारी मैदानावर मंगळवारी (दि. १) सकाळी दहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. जिल्हा परिषद मतदारसंघ कुर्डूस व शहापूर विभागीतल महिलांसाठी हा मेळावा भरविला जाणार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, पान ६ वर

# 'मिथुन दा'ना दादासाहेब फाळके पुरस्कार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बॉलिवूडमध्ये 'डिस्को डान्सर' म्हणून ओळखले जाणारे दिग्गज आणि ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना यंदाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विट करून ही घोषणा केली आहे. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात दि. ८ ऑक्टोबर रोजी मिथुन चक्रवर्ती यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पान ६ वर

**सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल गौरव**



### मिथुन चक्रवर्ती यांची कारकीर्द

मिथुन यांचा जन्म १६ जून १९५० रोजी कोलकाता याठिकाणी झाला. त्यांनी बंगाली, हिंदी, तेलुगू, कन्नड, ओडिया आणि भोजपुरी अशा विविध भाषांमध्ये काम केले आहे. त्यांच्या नावावर ३५०हून अधिक सिनेमे आहेत. अभिनयाशिवाय त्यांनी निर्मिती क्षेत्रातही काम केले असून, सध्या मिथुन राजकारणात विशेष सक्रिय आहेत. याशिवाय त्यांनी तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले असून, दोन वेळा फिल्मफेअर पुरस्कारही जिंकला आहे.

### 'मृगया'तून पदार्पण

१९७६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मृगया' या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनय कारकीर्दीला सुरुवात केली होती. त्यांच्या या पहिल्याच सिनेमासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले होते. मात्र, त्यांच्या करिअरची गाडी 'डिस्को डान्सर' या सिनेमामुळे रुळावर आली. त्यांनी आत्तापर्यंत 'डिस्को डान्सर', 'प्यार झुकता नहीं', 'स्वर्ग से सुंदर', 'हम पांच', 'सहस', 'वरदात', 'बॉक्सर', 'प्यारी बहाना', 'प्रेम प्रतिज्ञा', 'मुजरिम' आणि 'अग्निपथ'सारख्या अनेक उत्तमोत्तम चित्रपटांत काम केले आहे.

**आजचा अग्रलेख**
**न सांगितलेल्या गोष्टी**

**वे|ध|क**

### 'राजकारणापासून देवाला दूर ठेवा'

**नवी दिल्ली :** तिरुपती मंदिर लाडू प्रसादप्रकरणी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने आंध्र प्रदेश सरकारवर ताशेरे ओढले आहे. आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या सरकारच्या काळामध्ये तिरुपती देवस्थानच्या लाडू प्रसादामध्ये जनावरांची चरबी आणि माशांच्या तेलाचा वापर होत होता, असा आरोप विद्यमान मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. लाडू प्रसाद तपासाचा निकाल लागण्याआधीच माध्यमांमध्ये निवेदन देण्याची काय गरज होती? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे. देवाला राजकारणापासून दूर ठेवलं पाहिजे, असं मत न्यायालयाने व्यक्त केलं आहे. संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीकडून जबाबदारीची अपेक्षा असते. अहवाल जुलैमध्ये आला, मग सप्टेंबर महिन्यात त्यावर भाष्य का, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला आहे.

## फणसापूर ते चौल-गायचोळे रस्ता तात्काळ करा

# जनता त्रस्त, प्रशासन सुस्त

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील विविध रस्त्यांची दैना उडाली आहे. विशेष म्हणजे, फणसापूर ते चौल-गायचोळे या सात किलोमीटर रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. त्यामुळे सुमारे २३ गावांतील नागरिक याच रस्त्याचा वापर करतात. परंतु, रस्त्याची दुर्दशा झाल्याने ग्रामस्थ, विद्यार्थी, व्यावसायिक यांचे अतोनात हाल सुरु आहेत. तब्बल २० वर्षांपूर्वी या रस्त्यावर डांबर टाकण्यात आले होते. त्यानंतर या रस्त्याकडे जिल्हा परिषदेने ढुंकूनही पाहिले नाही. हा रस्त्याचे तातडीने नूतनीकरण करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना सोमवारी दिले.

रस्त्याची अवस्था दयनिय झाल्याने या रस्त्यावरून कुदे, सुडकोळी, नवखार, भागवाडी, भोनंग, नवघर, महान, मोरोंडे, उमटे, रामराज तसचे रामराज विभागातील सात ते आठ आदिवासीवाड्या, बोरघर, ताजपूर, मोरखोल, भिलजी, फणसापूर, बापळे, दिवी पारंगी, चिंचोटी, फुडेवाडी, चौल कातळपाडा, वलवली, वलवली आदिवासीवाडी अशा सुमारे २३ गावांतील नागरिक ये-जा करतात. त्यांचा रोजचा हा रहदारीचा रस्ता आहे. या सर्व गावांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी रेवदंडा पान ६ वर



- २३ गावांतील ग्रामस्थांना सोसावा लागतोय मनस्ताप
- ॲड. राकेश पाटील यांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**कुठे आहे आमचा रस्ता?**
सद्यःस्थितीत विद्यमान सरकारने १७ हजार ग्रामीण भागातील रस्ते मार्गी लावल्याची जाहिरात टीव्हीवर झळकते. मग, यामध्ये आमचा रस्ता कुठे आहे? जिल्हा परिषदेच्या माध्यमातून लाखोंचा निधी ग्रामीण भागातील रस्त्यासाठी खर्च केला जातो. मात्र, मागील वीस वर्षे डांबरीकरणापासून हा रस्ता वंचित आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी या रस्त्याच्या कामास मंजुरी द्यावी.

> फणसापूर ते चौल-गायचोळे या रस्त्यावरून जवळजवळ २३ गावांतील विद्यार्थी कॉलेजला जातात. विद्यार्थी तसेच नागरिकांचा चौल-रेवदंडा या बाजारपेठेकडे जाण्याचा एकमेव रस्ता आहे. मागील वीस वर्षांत या रस्त्याची डागडुजी करण्यात आलेली नाही. विकासाच्या बाता मारणाऱ्या नेत्यांनी तसेच रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने या रस्त्याचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा.
> – ॲड. राकेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते

## आ. दळवींकडून शेतकऱ्यांची बोळवण

- मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीचे आश्वासन हवेत विरले
- न्यायासाठी शेतकऱ्यांची न्यायालयात धाव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पटनी एनर्जी कंपनीने प्रकल्पाच्या नावाने जमिनी विकत घेतल्या. परंतु, प्रकल्प उभारला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत लढा दिला होता. यावेळी आमदार महेंद्र दळवी यांनी शेतकऱ्यांना पाठिंबा दर्शवत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले होते. परंतु, प्रत्यक्षात कोणतीही दखल न घेता शेतकऱ्यांची आश्वासनावर बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया काही शेतकऱ्यांनी 'कृषीवल'शी बोलताना व्यक्त केली.

अलिबाग तालुक्यातील मेढेखार, काळवडखार येथील ४७५ शेतकऱ्यांकडून ८१ हेक्टर शेतजमीन पटनी एनर्जी व इतर कंपन्यांसाठी विकत घेण्यात आली. अठरा वर्षांपूर्वी एकरी तीन लाख ५० हजार रुपयांनी जमीन विकत घेण्याचे ठरले. परंतु, काही शेतकऱ्यांना फक्त ५० टक्केच रक्कम देऊन कंपनीने फसविले. प्रकल्पातून मुलांना रोजगार मिळेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंतु, त्यांची फार मोठी निराशा झाली. जमिनी विकत घेऊन प्रकल्प उभारले नसल्याने ही जागा नापिक झाली आहे. त्यामुळे जमीन परत मिळावी यासाठी मागील वर्षी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन पुकारले होते. या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. दरम्यान, आमदार महेंद्र दळवी यांनी त्यावेळी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावू, असे आश्वासन दिले होते. मात्र, आजपर्यंत त्याबाबत कार्यवाही झाली नसल्याची खंत काही शेतकऱ्यांनी व्यक्त केली. आमदारांनी आश्वासन देऊनही कार्यवाही न झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, याबाबत शेतकऱ्यांनी न्यायालयीन लढा सुरू केल्याचे सांगितले आहे.

## विद्यार्थी, शिक्षकांचे दायित्व 'डेक्कन'चे



**आरसीएफ शाळेबाबत विभागीय शिक्षण उपसंचालकांचा निर्णय**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आरसीएफच्या कुरुळ वसाहतीतील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने आरसीएफ व्यवस्थापन करीत असलेल्या सकारात्मक प्रयत्नांना यश आले आहे. शाळेचे व्यवस्थापन डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांनी सुरू ठेवावे, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई येथील विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी नुकत्याच आयोजित केलेल्या सुनावणीत घेतला आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे, ही प्राथमिक जबाबदारी पान ६ वर

> आरसीएफ शाळेतील कर्मचाऱ्यांचे पाच ते सहा महिन्यांचे वेतन शाळेच्या खात्यात आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडून मान्यता घेऊन ते वेतन काढण्याची जबाबदारी शाळेतील मुख्याध्यापकांची आहे.
> – संतोष वझे, आरसीएफ जनसंपर्क कार्यालय

## पुरवठा अधिकाऱ्यांचा शंभर टक्केचा दावा खोटा

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

- कृषीवल टीमकडूनन तालुक्यातील ३४ रेशन दुकानांमध्ये पडताळणी
- अद्याप १२ हजार सोयाबीन तेल पोहोचलेलेच नाही

अलिबाग व उरण तालुक्यात शंभर टक्के आनंदाचा शिधा पोहोचला असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सांगितले. याबाबत कृषीवल टीमने पडताळणी केली असता वेगळेच चित्र दिसून आले. अलिबाग तालुक्यात रवा, साखर, मैदा वगळता आनंदाच्या शिधा कीटमध्ये १२ हजार सोयाबीन तेल कमी असल्याची माहिती समोर आली असून, ३४ दुकानांपर्यंत शिधा पोहोचलाच नसल्याचे उघड होत आहे. त्यामुळे पुरवठा अधिकाऱ्यांचा शंभर टक्केचा दावा खोटा ठरला आहे.

अलिबाग तालुक्यात आनंदाचा शिधा घेणारे ४० हजार लाभार्थी आहेत. ९७ दुकानांमार्फत हा शिधा दिला जाणार आहे. गणेशोत्सवात मिळणारा शिधा तालुक्यातील अलिबाग व पोयनाड येथील गोदामातून दुकानांमध्ये आनंदाचा शिधा उपलब्ध झाला. पान ६ वर

**शासनामार्फत निवडण्यात आलेल्या ठेकेदाराकडून आनंदाच्या शिधाचे जिन्नस शंभर टक्के येत नसल्याने ते ग्राहकांपर्यंत पोहोचविणे कठीण होऊन बसले आहे. तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी कार्यालयासह तालुक्यातील रास्त भाव दुकानांनादेखील शिधाधारकांच्या रोषाला बळी पडावे लागत आहे.**

## देशी गायीला राज्यमातेचा दर्जा

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने सोमवारी (दि. ३०) देशी गायीला राज्यमाता म्हणून घोषित केले आहे. या निर्णयाचा राज्य सरकारने अधिकृत आदेशही काढला आहे. वैदिक काळापासून भारतीय संस्कृतीत गायीला महत्त्वाचे स्थान असल्याचे राज्य सरकारने म्हटले आहे. देशी गायीला राज्यमाता म्हणून घोषित करणारे महाराष्ट्र हे दुसरे राज्य ठरले आहे.

गायीला राज्यमाता म्हणून घोषित करणारे उत्तराखंड हे भारतातील पहिले राज्य आहे. उत्तराखंड विधानसभेने १९ सप्टेंबर २०१८ रोजी यासंदर्भात एक ठराव मंजूर केला, ज्यामध्ये गायीला राज्यमातेचा दर्जा देण्याची मागणी करण्यात आली होती. हा ठराव एकमताने मंजूर करून केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. पान ६ वर






**शेतकऱ्यांच्या मुलांचा प्रेरणादायी प्रवास**

# मेहनतीच्या बळावर कमावली वर्दी

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

बिकट परिस्थितीत जिद्द, आत्मविश्वास व कठोर मेहनतीच्या जोरावर सख्ये बहीण-भाऊ पोलीस खात्यात भरती झाले आहेत. शेतकरी वडिलांनी त्यांच्या या प्रगतीसाठीदेखील मोलाचा वाटा उचलला आहे. हे दोघे बहीण-भाऊ रोहा तालुक्यातील बाहेरशिव या छोट्या गावातील आहेत. शेतीची कामे व दूध विकून त्यांनी परिश्रम व अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. या दोघा बहीण-भावाचा हा थक्क करणारा प्रवास सर्वांसाठीच मार्गदर्शक ठरत आहे. पान ६ वर

### अथक परिश्रम

पहाटे चार वाजता उठून गोठा साफ करून म्हशींचे दूध काढून सहा वाजेपर्यंत दोघे भाऊ-बहीण हे दूध नागोठण्यामध्ये विकून त्यानंतर भरतीच्या क्लाससाठी २८ किमीचा प्रवास करून जात. सकाळी ग्राऊंड, लेक्चर व लॅब हे सगळं करून सायंकाळी सहा वाजेपर्यंत घरी पोहोचत. सगळी कामं उरकून अभ्यास करायचे. शेतात पण सगळी काम करायचे. मनात फक्त एकच गोष्ट होती; भरती व्हायचे अन् आपल्या आईवडिलांचे नाव छातीवर घेऊन फिरायचं.



### पडत्या काळात सगळ्यांनी साथ सोडली...

डोळ्यांच्या कडा पुसत हर्षल सांगत होता, आमच्या संघर्षाच्या काळात अनेक अडचणी आल्या; परंतु, आम्ही हार मानली नाही. सर्व संकटांवर पुरून उरलो. वाईट काळात सगळ्यांनी साथ सोडली, पण आईवडील खंबीरपणे सोबत होते. आईवडिलांचं सोबत असणं, हीच जगातली सर्वात मोठी ताकद आहे. आणि, त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरवून पहिल्या भरतीतच माझ्या ताईची भाग्यश्री पालांदे रायगड पोलीस दलात निवड झाली. तिच्या कष्टाचं चीज झालं. राहिला विषय माझा, तर मी दोन ठिकाणी अनुक्रमे १ व २ मार्क्सनी वेटिंगला राहिलो. भरपूर लोकांनी माझी लायकीसुद्धा काढली. पण माझा स्वतःवर विश्वास होता. ही गोष्ट पचवणं माझ्यासाठी अशक्य होती. परंतु, आपल्या बहिणीच्या खुशीत मी पण खूप खुश होतो. सगळीकडे भरपूर नाव झालं. गावातून पहिली पोलीस म्हणून माझ्या ताईचं नाव झालं. मीसुद्धा हार मानली नव्हती, पुन्हा नव्याने सुरुवात केली. ताईचा भरपूर सपोर्ट मिळाला. चारही बहिणी, आईवडील, अकॅडमीचे सर आणि मित्रपरिवार यांच्या पाठिंब्यामुळे मी दिवसरात्र मेहनत केली. आणि माझी ठाणे पोलीस दलात वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी निवड झाली. माझ्या आयुष्यातील ते पहिलं यश होतं. २०२१ ला चालू केलेला प्रवास २०२४ ला संपला. ही तर सुरुवात आहे. पुढे खूप काही करायचं आहे, असे हर्षल म्हणाला.

# शेतकऱ्यांनी जनावरे मोकाट सोडू नये

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

जनावरे रस्त्यावर आल्याने अनेक अपघात होत असून, यात अनेकांचा जीवही गेला असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. याची खबरदारी आणि उपाययोजना म्हणून खालापूर पोलिसांनी गावागावात जाऊन जनजागृती करुन जनावरे मोकाट सोडू नका, असे आवाहन खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.

खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुना मुंबई-पुणे महामार्ग, खोपोली-पाली रस्ता, खोपोली-पेण रस्ता येत असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते, त्यातच आजूबाजूच्या शेतकऱ्यांची जनावरे हे रस्त्यावर येऊन वाहतुकीला अडथळा येत आहेत. यामुळे अपघात झाले असून यात माणसांचा आणि जनावरांचा जीव गेला आहे.

## शुद्धीपत्रक

दैनिक कृषीवल पेपरमध्ये दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पान नं.२ आणि पान नं.७ वर विशेष वसुली व विक्री अधिकारी, दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग यांच्या ४ लिलावाच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या होत्या. या जाहिरातींमध्ये नजरचुकीने मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा असे छापण्यात आले आहे, तरी ते तसे न वाचता मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा असे वाचण्यात यावे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१ ऑक्टोबर**

१) श्री. शामराव बारक्या ठाकूर, हाशिवरे, १-१०-१९३५
२) श्रीम. पूर्णिमा भालचंद्र चव्हाण अलिबाग, १-१०-१९४९
३) श्रीम. प्रतिभा कुमार टोळ अलिबाग, १-१०-१९४५
४) श्री. अविनाश भगवान सुतार अलिबाग, १-१०-१९५६
५) श्रीम. विद्या पद्माकर कुवळेकर अलिबाग, १-१०-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राउत) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**गं. भा. इंदिरा राजाराम पिळनकर, स्मरणार्थ, दिवेआगर**

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज १९०/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. सय्यद रिजवान सलीम कादिरी
रा.दस्तुरी नाका-मुरूड, ता. मुरूड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामसेवक, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. सय्यद रिजवान सलीम कादिरी, यांचा जन्म दि. १४/०२/१९८४ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अँड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. सय्यद रिजवान सलीम कादिरी, यांचा दि. १४/०२/१९८४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. २२/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २४/०९/२०२४ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज १५/२०२३

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. किर्तीमाला परशुराम नर
रा.मु. साखर कोळीवाडा, पो. आक्षी — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत आक्षी — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे साखर कोळीवाडा, आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांनी सासु कै. गंगा मारूती नर यांचा मृत्यू दि. ११/०९/१९४८ रोजी साखर कोळीवाडा, आक्षी येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आक्षी येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत आक्षी यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २३/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ६६/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. कल्पेश काशिनाथ कवळे
मु. लोणारे घरत आळी, पो. थळ — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत थळ — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे लोणारे घरत आळी, पो. थळ, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आजी कै. गंगुबाई मधुकर कवळे यांचा मृत्यु दि. २६/०१/१९९७ रोजी मौजे लोणारे घरत आळी, पो. थळ ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत थळ येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत थळ यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ६८/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. कल्पेश काशिनाथ कवळे
मु. लोणारे घरत आळी, पो. थळ — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत थळ — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे लोणारे घरत आळी, पो. थळ, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची पंजी कै. यशोदाबाई पाटील उर्फ यशोदाबाई आबा घरत यांचा मृत्यु दि. १५/०७/१९६५ रोजी मौजे लोणारे घरत आळी, पो. थळ ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत थळ येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत थळ यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी,

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २९/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ८३/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. सतीश शंकर चिंचकर
मु. काळोशी, पो. खंडाळे — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे काळोशी, पो. खंडाळे, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा भाऊ कै. संजय शंकर चिंचकर यांचा मृत्यू दि. १०/०५/१९९६ रोजी मौजे काळोशी, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत खंडाळे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत खंडाळे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २७/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज १८६/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. नाझीम सलीम कादिरी,
रा.दस्तुरी नाका-मुरूड, ता. मुरूड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामसेवक, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. नाझीम सलीम कादिरी, यांचा जन्म दि. ३०/०३/१९८२ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अँड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. नाझीम सलीम कादिरी, यांचा दि. ३०/०३/१९८२ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. २२/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २४/०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज १३/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. चंपा बजरंग जाधव
मु. शास्त्री नगरी, अलिबाग कोळीवाडा — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत आक्षी — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार श्रीम. चंपा बजरंग जाधव यांचा जन्म दि. ०१/०१/१९५३ रोजी राहत्या घरी मौजे साखर-आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आक्षी कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत आक्षी येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत आक्षी यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २३/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ११/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. स्वाती संजय घरत
रा. माणिक कॉलनी, गोसपाडा, नागाव — अर्जदार
ता.उरण, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे गुंजीस अलिबाग, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार श्रीम. स्वाती संजय घरत जन्म दि. ३१/१२/१९६९ रोजी मौजे गुंजीस, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २७/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ११/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. किर्तीमाला परशुराम नर
रा.मु. साखर कोळीवाडा, पो. आक्षी — अर्जदार
ता.अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत आक्षी — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे साखर कोळीवाडा, आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आजे सासरे कै. नथु विठू नर यांचा मृत्यू दि. २१/०६/१९२० रोजी साखर कोळीवाडा, आक्षी येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आक्षी येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत आक्षी यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २३/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज १८७/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. अफरोज सलीम कादिरी,
रा.दस्तुरी नाका-मुरूड, ता. मुरूड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामसेवक, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. अफरोज सलीम कादिरी, यांचा जन्म दि. १९/०७/१९५४ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अँड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. अफरोज सलीम कादिरी, यांचा दि. १९/०७/१९५४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. २२/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, सौ.शैला गजानन बोराडे, यांनी फ्लॅट मालक श्री. संजय वासुदेव पवार, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची खालील वर्णनाची फ्लॅट मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत जि. रायगड, येथील सिटी सर्व्हे नंबर १/१, प्लॉट नंबर ४, या मिळकतीवरील हरिद्वार अपार्टमेंट, या इमारतीमधील, A विंग, तळ मजल्यावरील सदनिका क्रमांक ००३, क्षेत्र ४४३ चौ. फुट,

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच फ्लॅट विक्री करारनामा करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८
कर्जत दि. १/१०/२०२४

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ८१/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. मंदा भरत पाटील
मु.पाटील चाळ, एस.व्ही.रोड, आंबेवाडी, — अर्जदार
कांदीवली वेस्ट, मुंबई ४०००६७
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार डावली — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे पाटील चाळ एस.व्ही. रोड, आंबेवाडी कांदीवली वेस्ट, मुंबई येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आई कै. सुमती दामोदर पाटील यांचा मृत्यु दि. ०२/१०/१९८० रोजी मौजे नवखार, पो. सारळ, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत रांजणखार डावली येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रांजणखार डावली यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २७/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरूड, जि. रायगड)
**ज.म.र. अर्ज १८८/२०२४**

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. शगुफता आदिल कादिरी,
रा.दिघी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामसेवक, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा,
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. शगुफता आदिल कादिरी, यांचा जन्म दि. १५/११/१९७५ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अँड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. शगुफता आदिल कादिरी, यांचा दि. १५/११/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. २२/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २४/०९/२०२४ रोजी माझी सही सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या विनशेती मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक रियाझ अमीरअली करमाळी व असीफ अमीरअली करमाळी रा. डीवाईन ग्रेस, गल्ली नं. ७, हिमगीरी शाळेसमोर, टिंगरे नगर, पुणे ४११०३२ यांच्याकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (आर.चौ.मीटर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| १) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. १ | ४-५४-९४ | ४५.४९ |
| २) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. २ | ६-०९-२५ | ६०.९३ |
| ३) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ३ | ५-०६-५० | ५०.६५ |
| ४) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ४ | ५-५७-२५ | ५५.७३ |
| ५) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ५ | ५-४८-२५ | ५४.८२ |
| ६) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ६ | ३-७६-०० | ३७.६० |
| ७) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ७ | ३-६२-३१ | ३६.२३ |
| ८) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ८ | ३-५७-५० | ३५.७५ |
| ९) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. ९ | ५-००-०० | ५०.०० |
| १०) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ ब/२ प्लॉट नं. १० | ७-२८-०० | ७२.८० |

सदरहू बिनशेती मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहान, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ३०/०९/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)
ज.म.र. अर्ज ८२/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. मंदा भरत पाटील
मु.पाटील चाळ, एस.व्ही.रोड, आंबेवाडी, — अर्जदार
कांदीवली वेस्ट, मुंबई ४०००६७
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार डावली — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे पाटील चाळ एस.व्ही. रोड, आंबेवाडी कांदीवली वेस्ट, मुंबई येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. दामोदर सिताराम पाटील यांचा मृत्यु दि. १२/०५/१९८२ रोजी मौजे नवखार, पो. सारळ, ता. अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत रांजणखार डावली येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रांजणखार डावली यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.
ठिकाण : अलिबाग
तारिख : २७/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)
ज.म. र अर्ज २३/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. मन्सुर अहमदअली अब्बास शेख+
रा. केएसए रॉयल, फ्लॅट नं. १८०८, — अर्जदार
१८ वा मजला, १ ली आणि २ री सांकली स्ट्रीट,
ई वॉर्डलजवळ, भायखळा, मुंबई
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत पेढांबे
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे शेखांचे गाव अलिबाग, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा मन्सुर अहमदअली अब्बास शेख यांचा जन्म दि. ०८/०८/१९६६ रोजी मौजे शेखांचे गांव, येथील राहत्या घरी झाला होता. २. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत पेढांबे येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत पेढांबे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत में, तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२५/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २५/०१/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

निवडक

## मंगळसूत्र खेचून चोर पसार

**पनवेल :** महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून दोघेजण दुचाकीवरून पळून गेले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.आदिती सिंग या कामोठे येथे राहत असून त्या घरी जात असताना मालवण तडका हॉटेल, कामोठे येथे पोहोचल्या. यावेळी पाठीमागून काळ्या रंगाच्या एटीएम मोटरसायकलवरून दोन अनोळखी इसम आले. त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून ते पळून गेले. मंगळसूत्र खेचून नेल्याप्रकरणी चोराविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## आरोग्यविषयक प्रबोधन

**पनवेल :** युनिक्युर इंडिया संस्थेतर्फे पनवेल तालुका पोलिसांचे आरोग्य विषयक प्रबोधन करण्यात आले.त्यामध्ये प्रामुख्याने गॅस, ॲसिटीडी, कफ, वात, पित्त, वजन कमी किंवा जास्त, मुत्र रोग, त्वचेचे रोग, लिव्हरचे रोग, पोट साफ नसणे, डोळ्यांचे त्रास आदी संदर्भात घ्यावयाची काळजी व त्यावर घरगुती उपाय या संदर्भातील माहिती आज पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आली. तसेच आवश्यक ती औषधे सुद्धा यावेळी देण्यात आली आहेत.

## मृताच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** एका अनोळखी इसम आढळून आल्याने इसमास पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले आहे. सदर इसमाच्या नातेवाईकांचा पनवेल शहर पोलिसांकडून शोध सुरू आहे. हा इसम ४५ ते ५० वर्ष वयोगटातील असून, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशी वाढलेली पांढरी, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट, अंगात राखाडी रंगाचा हाफ शर्ट फुल पॅन्ट आहे. या इसमाबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी पोलिसांना संपर्क साधावा.

## मोफत आरोग्य शिबीर

**पनवेल :** शिव आरोग्य सेना रायगड जिल्ह्यातर्फे जागतिक हृदय दिनानिमित्त खारघर पनवेल मेडिकवर हॉस्पिटल तर्फे मोफत हृदय तपासणी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये मोफत ब्लड प्रेशर तपासणी, इसीजी तपासणी, बीएमआय, रक्तातील ऑक्सिजन तपासणी, डॉक्टरचा मोफत सल्ला इत्यादीचा समावेश होता. याप्रसंगी शिव आरोग्य सेना रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. परेश देशमुख, अलिबाग तालुका समन्वय सचिव अनिल कांबळे यांचा सन्मान करण्यात आला.

## शेखर पाटील यांचा सन्मान

**उरण :** छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती युनिव्हर्सिटीमध्ये शेखर पाटील यांनी नुकतीच एल एल एम, मास्टर ऑफ लॉमध्ये ७९.९४ मार्क मिळवून उत्तीर्ण झाले. छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटी पनवेल येथे पदवीदान समारंभात पद्मश्री डॉ.जी डी यादव, युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष केशव बढाया यांच्या हस्ते पदवी देण्यात आली. शेखर पाटील यांनी कॉन्स्टिट्यूशन या विषयामधून पदवी ग्रहण केली. पत्रकारिता, समाजकारण करत नोकरी सांभाळून त्यांनी एलएलएम पदवी प्राप्त केली.

# कोणतीही बदलीची फाईल अडवलेली नाही

## आरोग्य विभागाचा कारभार सुरळीत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आरोग्य विभागाने कोणतीही बदलीची फाईल आडवलेली नाही, अथवा मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सुधारण्याची संधी देण्याबाबत कारवाई थांबवली, असे काहीच घडलेले नाही. आरोग्य विभागाचा कारभार हा सुरळीत सुरु असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांनी स्पष्ट केले आहे.

आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. त्यांच्या कार्यमुक्तीच्या फाईल माझ्याकडे शक्रवारी २० सप्टेंबर २४ रोजी संध्याकाळी सादर झाल्या होत्या. २१ आणि २२ सप्टेंबर रोजी अनुक्रमे शनिवार, रविवारी सार्वजनिक सुट्टी होती. २३ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयात भरती प्रक्रियेचे कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत सुरु होते. तसेच दुपारी ४ ते साडेसहा वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आढावा बैठकीसाठी जावे लागले होते. त्यानंतर २४ सप्टेंबर रोजी तब्येत बरी नसल्याने मी एक दिवसाची किरकोळ रजा घेतल्याचे डॉ. विखे यांनी सांगितले. याबाबत मोबाईलद्वारे मुख्यकार्य अधिकारी यांना कल्पना दिली होती. त्यामुळे संबंधीत कार्यमुक्तीच्या फाईल रोखल्या नव्हत्या.

मुख्यकार्य अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी कार्यमुक्तीच्या फाईलबाबत विचारले असता उद्या सादर करणार, असे त्यांना सांगितल्याचेही डॉ. विखे यांनी सांगितले. साथीच्या सर्व्हेक्षण व नियंत्रण करणे याची जबाबदारी आमची नसून ती जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाचीच आहे, असेही डॉ.विखे यांनी स्पष्ट केले.



# जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना तोंडी सूचना दिल्या होत्या

## डॉ. भरत बास्टेवाड यांची माहिती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भातील फाईली जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या सहीनेच पूर्ण होतात. त्यामुळे अशा महत्वाच्या फायली त्यांच्याकडे निर्धारीत वेळेत आल्या नाही, तर त्या मागवण्याचा अधिकार त्यांना आहे. त्यानुसारच काही दिवसांपूर्वी आरोग्य विभागातील बदलींच्या फाईली त्यांनी त्यांच्याकडे मागवल्या होत्या. याबाबत पुन्हा फाईली साठवून ठेऊ नका, अशा तोंडी सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांना केल्या असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी कृषीवलशी बोलताना दिली.

जिल्हा आरोग्य विभागाच्या अखत्यारित काम करणाऱ्या तीन तालुका आरोग्य अधिकारी यांची बदली करण्यात आली होती. त्यामध्ये पनवेलच्या तालुका अधिकाऱ्यांना पेण व पेणच्या तालुका अधिकाऱ्यांना पनवेलमध्ये तसेच तिसऱ्या तालुका अधिकाऱ्याची अन्य ठिकाणी बदली करण्याबाबत कार्यवाही सुरु होती. या बदलीमध्ये खुद्द जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांचादेखील समावेश होता. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात बदलीची फाईल होती. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी बास्टेवाड यांच्या लक्षात आली. त्यांनी चार दिवसापूर्वी बदलीची फाईल मागविली असल्याचे सांगितले. अशा फाईली ठेऊ नका, अशा तोंडी सूचना संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिल्याचे डॉ. बास्टेवाड यांनी स्पष्ट केले. तसेच पुन्हा असा प्रकार करू नका, अशी सक्त सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना तोंडी सूचना दिल्या आहेत. त्यामुळे मुख्याधिकारी आता कोणत्याही विभागाकडे कोणत्याही कामाची फाईल मागवू शकतात. या भीतीने अन्य अधिकारी आता सतर्क झाले आहेत. साहेब कधी ही फाईल मागवतील. यासाठी ती वेळेत परिपूर्ण करुन ठेवणे आणि त्यावर उचित कार्यवाही करण्याकडे सर्वच अधिकाऱ्यांचा कल असल्याचे दिसून येते.

दरम्यान, कोणत्याही व्यक्तीचे काम अडकून राहू नये, ते वेळेत हाता वेगळे व्हावे, असा हेतू डॉ. बास्टेवाड यांचा चूकीचा नाही. त्यामुळे यंत्रणांना एक शिस्त तर लागेलच शिवाय कोणालाही कामासाठी ताटकळत बसावे लागणार नाही.

# लोकल प्रवाशांना सीपीआर तंत्राचे धडे



**। पनवेल । वार्ताहर ।**

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात हृदयविकारांच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनेकदा हृदयाचा झटका इतक्या वेगात येतो की त्यात मृत्यू ओढवतो. मात्र, या अशा प्रसंगात हॉस्पिटलला पोहोचेपर्यंत जर काही प्राथमिक उपचार मिळाले तर काहीवेळा प्राण वाचण्यास मदत होते. अशावेळी हृदयरोगावर गेमचेंजर ठरलेला उपाय म्हणजे कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन. या उपायाने अनेकांचे प्राण वाचले आहेत.जागतिक हृदय दिनानिमित्त, मेडिकवर हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी खारघर तसेच पनवेल रेल्वेस्थानकावर कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशनचे एक तासाचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले होते. यामध्ये नागरिकांना सीपीआर प्रशिक्षण देण्यात आले.

डॉ. अभिजित सावंत यांच्या नेतृत्वाखालील या प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले असून खारघर, पनवेल सारख्या विविध स्थानकांवर जिथे शेकडो नागरिक प्रवास करतात अशा ठिकाणी सीपीआर तंत्राविषयी माहिती व प्रशिक्षण देण्यात आले.

भारतात हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीच्या आजाराचे प्रमाण वाढत आहे, ज्याचा परिणाम केवळ प्रौढावरच नाही तर तरुणांवरही होत आहे. शारीरिक हालचालींचा अभाव, आनुवंशिकता, धूम्रपानाची वाईट सवय, आहाराच्या चुकीच्या सवयी आणि ताण-तणाव, अति व्यायाम, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल, मद्यपान, चरबीयुक्त पदार्थांचे सेवन यासारखे अनेक घटक हृदयरोगास कारणीभूत ठरतात. तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका, अचानक हृदयविकाराचा झटका येणे, हृदयविकाराचा झटका येणे यासारख्या घटनांमध्ये होणारी चिंताजनक वाढ असून हे एक चिंतेचे कारण ठरत आहे. मुंबईची 'लाइफ लाईन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनवरने दिवसाला लाखो लोकं प्रवास करतात हे ओळखून नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटल्सने रेल्वे स्थानकांवर प्रशिक्षण सत्र आयोजित केले.

हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान केले जाणारे सीपीआर हे जगण्याची शक्यता वाढवते. सर्वसामान्य नागरिकांना 'सीपीआर' येणे गरजेचे असल्याचे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. त्यासाठी, गोल्डन अवरमध्ये उपचार आवश्यक आहेत. गोल्डन अवर म्हणजे हृदयाचा झटका आल्यानंतर तत्काळ जे प्रथमोचार ज्या वेळेत रुग्णांना मिळतात त्या वेळेला गोल्डन अवर म्हणतात. अनेक व्यक्तींना या वेळेत सीपीआर दिल्यामुळे रुग्ण बचावल्याच्या अनेक घटनांची नोंद हृदयरोगतज्ज्ञांकडे आहे.

## लॅपटॉपची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पार्क करून ठेवलेल्या कारची काच फोडून एक लाख रुपये आणि लॅपटॉपची चोरी केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. सुयश नलावडे हे माणगाव येथे राहत असून त्यांनी त्यांच्या वडिलांच्या नावे असलेली कार ही जलाराम फास्ट फूडच्या समोर, अग्निशामक कार्यालयासमोर नवीन पनवेल येथे पार्क करून ठेवली व ते त्यांच्या मुलाला घेऊन मोहिते हॉस्पिटलमध्ये गेले. यावेळी गाडीमध्ये त्यांनी लॅपटॉप, ऑफिसचे कागदपत्र आणि बॅगमध्ये एक लाख रुपये ठेवले होते. ते संध्याकाळी कारमध्ये असलेले सामान घेण्यासाठी गेले असता कारची डाव्या साईडची काच कोणीतरी फोडल्याचे दिसून आले. गाडीमधून एक लाख रुपये आणि लॅपटॉप चोरीला गेल्याचे दिसून आले.

# पनवेल राष्ट्रीय लोक अदालतीत ३,१५३ प्रकरणे निकाली

**। पनवेल । वार्ताहर ।**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या पनवेल येथील न्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व आणि दाखल अशी एकूण ३,१५३ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे. अशी माहिती जे.डी.वडणे, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांनी दिली.



- **१४ कोटी ४५ लाख ६३ हजारांची वसुली**
- **लोक अदालतसाठी सात कक्षांची केली स्थापना**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच एमएसईबी, बँक, फायनान्स, पतपेढी संस्था अशा विविध विभागांकडून आलेली वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. पनवेल येथील जिल्हा न्यायालयात आयोजित केल्या गेलेल्या लोक अदालतीमध्ये वादपुर्व व प्रलंबित अशी एकूण २३,९८८ प्रकरणे ठेवण्यात आली होती. १९,२८९ वादपूर्व प्रकरणांपैकी २,३६२ आणि ४,६९९ प्रलंबित खटल्यांपैकी ७९१ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. व त्याद्वारे पक्षकारांना आणि विविध विभागांना एकूण १४ कोटी ४५ लाख ६३ हजार ९४८ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे. पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ आणि संपूर्ण कार्यकारणी मंडळ यांचे विशेष सहकार्य मिळाले. पनवेल येथील न्यायालयात लोकअदालतीचे ७ कक्ष स्थापन करण्यात आले होते. यासाठी कक्ष प्रमुख म्हणून एस. आर.चव्हाण - जिल्हा न्यायाधीश - ४ व अति. सत्र न्यायाधीश, पनवेल, एन.पी.पवार, दिवाणी न्यायाधीश व.स्तर पनवेल, के. एम. सोनवणे, ३रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल, एन.एस. काकडे, ४थे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, पनवेल, श्रीमती एस.व्ही. साळवी, ३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पनवेल, पी. सी. बिडकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, पनवेल, डी. एम. वाघमारे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, पनवेल यांनी काम पाहिले तसेच पंच म्हणून ॲड. इंद्रजीत भोसले, ॲड. संतोषी चव्हाण, ॲड. सुयश कामेरकर,ॲड. मनीषा गावंडे, ॲड. वैशाली सुळेभावीकार, ॲड. समिना खान, ॲड. सुनिल येंदारकर यांनी काम पाहिले. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून देखील प्रकरणे मिटवण्यात आली.

या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग , न्यायालयीन कर्मचारी स्मिता आपटे, सहा.अधीक्षकजिल्हा न्यायालय, अविनाश चंदने, कनिष्ठ लिपिक आणि शैलेश कोंडसकर, विधी स्वयंसेवक, जिल्हा न्यायालय, पनवेल तसेच महानगरपालिका, बँक, पोलीस प्रशासन सर्व पक्षकार यांनी प्रतिसाद दिला.

## खारपाडा रस्ता धोकादायक

**। आपटा । वार्ताहर ।**

आपटा गाव ते खारपाडा रस्ता अरुंद असल्यामुळे वाहनांना धोकादायक आहे. त्यातच रस्त्याच्या कडेला साईटपट्टी नसल्यामुळे अवजड वाहने आले तर दुचाकीस्वारांना व इतर वाहनांना रस्त्याखाली उतरावे लागते. त्यामुळे बाजूला खड्डे तर दुसऱ्या बाजूला पाताळगंगा नदीचे पात्र असल्यामुळे अपघात घडत आहेत. यातच भर म्हणून रस्त्याच्या कडेला गवत व झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत आणि हा रस्ता उंच खोल व ठिकठिकाणी वळणे असल्यामुळे धोकादायक आहे.

नुकतेच या रस्त्याचे काम करण्यात आले. मात्र खबरदारी घेतली गेली नाही. नदीचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे कित्येकदा पावसाळ्यात हा रस्ता जलमय झाल्यामुळे बंद होतो. त्यामुळे वाहन चालकांचे हाल होत आहेत. या रस्त्यावर ज्या ठिकाणी पाणी साचते असते, अशा ठिकाणी रस्ते उंच करण्याची गरज आहे.

लोणा कंपनीच्या शेजारी नाल्याचे पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे हा रस्ता बंद होतो तर पुढे रेल्वे पुलाजवळ पुलाखाली पाणी साचल्यामुळे रस्ता बंद होतो. ज्या ठिकाणी रस्ता खाली आहे, त्या ठिकाणी रस्ता उंच करण्याची गरज आहे. कारण नदीचे पात्र लगतच असल्यामुळे नदीचे पाणी रस्त्यावर येते. यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच नदीच्या पात्रात बांधकामे केली असल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले आहे. त्यामुळे पाणी रस्त्यावर येते. नदीच्या पात्राशेजारी बांधकामे होणार नाहीत याची दखल सार्वजनिक बांधकाम खात्याने घेऊन रस्ता तयार करावा अशी मागणी होत आहे.



● मुरुड-आंगरदांडा इंदापूर रस्ता ४ पदरी झाल्याने पर्यटकांचा प्रवास सुखाचा झाला आहे. आंगरदांडा येथे डोंगर कापून रस्ता बनल्याने पर्यटक खास थांबून सेल्फी काढण्यासाठी थांबतात. (छायचित्र : सुधीर नाझरे)

### बेमुदत उपोषण करण्याचा ग्रामस्थांचा इशारा

# अडीचशे कोटींची जमीन सिडकोला देण्यास नकार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पेंधर गावात चारशे ते पाचशे कुळ असून त्यापैकी प्रत्येकाचा भाव अडीचशे कोटी रुपये आहे. मात्र महसूल विभाग आणि सिडको मार्फत कुळांवर अन्याय करुन सावकार तसेच इतर महसूल अधिकारी हजारो रुपयांचा भ्रष्टाचार करत आहेत. ताब्यात असलेल्या कुळाच्या जमिनी इतरांच्या नावावर करुन सिडको व प्रशासन यात गोंधळ कारभार चालू आहे. आमच्या कुळहक्काच्या जमिनींचे संरक्षण करुन न्याय द्यावा अन्यथा सिडको समोर बेमुदत उपोषणास बसू असा इशारा पेंधर येथील मनोज पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.



> कुळाच्या जमिनी परस्पर इतरांच्या नावावर करुन सिडकोने फसवणूक केली आहे. कुळकायदा नाकारण्याचा अधिकार कोणालाही नाही. सिडको आणि तहसिलदारांकडून उरण, पनवेलमध्ये खूप मोठा भ्रष्टाचार होत आहे. कुळकायद्याची अंमलबजावणी नाही झाली तर अन्यायाविरुध्द आवाज उठविणार आहे.
>
> – राजाराम पाटील, शेतकरी प्रबोधिनी

### पेंधर ग्रामस्थ आक्रमक

याबाबत सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाठ यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मुंबई कुळवहिवाट शेतजमिन अधिनियम १९४८ कलम ३ अ प्रमाणे १९४८ मध्ये सर्व्हे नंबर २५४/७+८ संरक्षित कुळ म्हणून नोंद असलेली प्रत्यक्ष ताबा कब्जा वहिवाट आणि राहत असलेले घर क्रमांक ७७३ चे बाजारमूल्य अडीचशे कोटी रुपये आहे. मात्र ही जमीन कुळ कायद्याची अंमलबजावणी न करता प्रांताधिकारी, मेट्रो सेंटर पनवेल -३ सिडको अध्यक्ष संजय शिरसाठ, तहसिलदार यांनी विष्णू म्हात्रे, नारायण म्हात्रे यांच्या नावे करुन कुळाची फसवणूक करण्याचा प्रयत्न संगनमताने केला आहे. त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवून आमच्या कुळहक्काच्या जमिनी जबरदस्तीने ताबा मिळवू पाहणाऱ्या सिडको, रस्त्याच्या ठेकेदारापासून संरक्षण द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. जमीन कसणाऱ्या मागासवर्गीय कुळांवर महसूल विभाग व नगरविकास विभाग पूर्वीच्या उच्चवर्गीय खोतांप्रमाणेच अन्याय करत आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शेतकरी प्रबोधिनीचे नेते राजाराम पाटील हे पेंधर ग्रामस्थांसोबत उपोषणास बसणार आहेत.

# चोरी करणारी दुकली अटकेत

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर परिसरातून तसेच तळोजा परिसरातून चार चाकी वाहनांसह दुचाकी वाहन व मोबाईल चोरी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

करंजाडे येथून सचिन गायकवाड यांची ५० हजार रुपये किंमतीची सॅन्ट्रो गाडी ही चोरीस गेली होती. त्याचप्रमाणे केटीएम मोटार सायकल जिची किंमत सुद्धा ५० हजार रुपये इतकी ही सुद्धा चोरी झाली होती. तसेच तळोजा परिसरातून मोबाईल चोरी झाले होते. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रकाश पवार, पो.उपनिरीक्षक अभय कदम, पो.हवा.धिरज थवई, सायबर एक्सपर्ट अमेय राजे, पो.शि.प्रसाद घरत, अभय मेहेर आदींचे पथक तांत्रिक तपासाद्वारे या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना सदर आरोपींची माहिती या पथकाला मिळताच त्यांनी सापळा रचून आरोपी कौशल पाटील (२५) व साहिल पाटील (२५) यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून चोरीची दोन वाहने व चोरीचे मोबाईल असा लाखो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या दोघांच्या अटकेमुळे अजूनही काही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# गृहित धरण्याला आक्षेप

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अभिनंदन करायला हवे. त्यांनी महाविकास आघाडीला खरमरीत पत्र लिहिले आहे. मुद्दा येत्या विधानसभा निवडणुकीतील जागावाटपाचा आहे. लोकसभेला दोन्ही कम्युनिस्टच नव्हे तर सर्व पुरोगामी पक्षांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला होता. सध्या आघाडीमध्ये जागावाटपाची घमासान चर्चा सुरू आहे. मात्र यात डावी आघाडी किंवा पुरोगामी पक्षांना कोठेही सामावून घेतले गेलेले नाही. आघाडीवाले जणू या पक्षांचा पाठिंबा गृहित धरून चालले आहेत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या गृहित धरण्यालाच जोरदार आक्षेप घेऊन १२ जागांची मागणी केली आहे. आघाडीच्या नेत्यांनी याची दखल न घेतल्यास होणाऱ्या परिणामांची जबाबदारी त्यांची राहील असेही त्याने बजावले आहे. आघाडीच्या नेत्यांना हे कोणीतरी जाहीरपणे सुनावणे आवश्यकच होते. यंदाची लोकसभा निवडणूक अभूतपूर्व होती. नरेंद्र मोदी यांनी चारसो पारचा नारा दिला होता. विरोधकांची धरपकड करणे, माध्यमे, न्यायालये यांच्यावर जरब बसवणे अशी अधिकाधिक पुढची पावले ते टाकत होते. देश पूर्ण हुकुम शाहीच्या दिशेने चालला होता. ही निवडणूक भाजप जिंकला तर आपल्याला तुरुंगात टाकले जाईल अशी भीती सर्व विरोधी नेत्यांनी व्यक्त केली होती. या असाधारण परिस्थितीमुळे डाव्या व पुरोगामी पक्षांनी देशातील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेससोबत सहकार्य करण्याचे ठरवले. यातूनच इंडिया आघाडी उभी राहिली. केरळमध्ये कम्युनिस्ट व काँग्रेस एकमेकांशी लढले असे काही अपवाद वगळले तर देशभर इंडियाने भाजपशी लढत दिली. त्याचा अनुकूल परिणाम दिसला. भाजपच्या जागा एकदम साठने खाली आल्या. महाराष्ट्रात आघाडीला ज्या ३१ जागा जिंकता आल्या त्यातही कम्युनिस्ट, शेकाप, समाजवादी इत्यादींच्या मतांचा वाटा आहे. पण आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गटाने आपल्या तिघांमध्येच या यशाची परस्पर वाटणी करून टाकली. बाकी पक्षांकडे दुर्लक्ष केले. लोकसभेच्या जागावाटपाच्या चर्चेतही हेच दिसून आले.

### स्वत:तच मश्गुल

राज्य विधानसभेच्या २८८ जागांच्या वाटपाच्या बैठकांच्या बातम्या रोज येत आहेत. मात्र त्यात डाव्या व पुरोगामी पक्षांचाही वाटा असेल असा उल्लेख आघाडीचे नेते करताना दिसत नाहीत. मध्यंतरी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन आपले मागणे त्यांना कळवले. याच रीतीने इतर पक्षांच्या नेत्यांच्या स्वतंत्र बैठका होत असतील. पण इंडिया म्हणून ज्या एकत्रित बैठका व्हायला हव्यात त्या झालेल्या नाहीत. लोकसभेच्या पराभवामुळे भाजप सैरभैर झाला आहे. मोदी आणि शाह यांनी सर्व लक्ष महाराष्ट्रावर केंद्रीत केले आहे. अमित शाह यांनी अलिकडेच महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले. त्यात त्यांनी महाराष्ट्रातला विजय किती आवश्यक आहे हे वारंवार सांगितले. इथल्या विजयामुळे वातावरण फिरले आहे असा संदेश पूर्ण देशभर जाईल असे ते म्हणाले. भाजपसाठी मुंबई व प्रगत महाराष्ट्र हातात ठेवणे अत्यावश्यक आहे. सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून तो याकडे पाहतो. एकनाथ शिंदे हे नावालाच शिवसेना चालवत आहेत. ते पदोपदी नरेंद्र मोदींचे नाव घेतात आणि भाजपचेच सर्व कार्यक्रम पुढे रेटत असतात. कोल्हापूरला त्यांच्या पक्षाचे अधिवेशन झाले तेव्हा ठरावांमध्ये जिकडेतिकडे मोदीच होते. मोदींच्या कृपेनेच ते मुख्यमंत्री झाले आहेत. त्यामुळे त्यांनी असली हुजरेगिरी करणे अपेक्षित आहे. याचाच अर्थ महाराष्ट्रात भाजपचीच सत्ता आणि त्यांचाच अजेंडा चालवला जात आहे. मुस्लिमांविरुध्द विषारी वातावरण तयार करणे, विरोधकांना खोट्या खटल्यांमध्ये अडकवणे असे प्रकार जारी आहेत. लोकसभेतील पराभवामुळे त्याला थोडा ब्रेक लागला आहे. मात्र विधानसभेला थोड्या जरी अधिक जागा मिळाल्या तरी ते विरोधकांना नष्ट करण्याच्या मागे लागतील हे उघड आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांना याची पुरेशी जाणीव आहे असे वाटत नाही. ते आपल्याच यशाच्या मस्तीत आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्ष आपल्याकडे अधिकाधिक जागा खेचण्याकडे मग्न आहे.

### डाव्यांची ताकद

लोकसभेचे यश हे एकत्रित प्रयत्नांचे यश होते. मोदीविरोधात लढण्यासाठी पक्ष एकत्र आलेले दिसल्याने मतदारांचा उत्साहही वाढला होता. त्यामुळेच त्यांना मोठे मतदान झाले. यात पुरोगामी व जागरूक मतदारांचा लक्षणीय वाटा होता. विधानसभेला आपोआप हेच पुन्हा घडेल असा भ्रम ठेवणे गैर आहे. डाव्या पक्षांच्या ताकदीची व पुरोगामी मतांची बूज त्यांना राखावी लागेल. हे कुठे जाणार आहेत अशा भावनेने त्यांच्याकडे पाहिले जाणार असेल तर त्याचा फटका विधानसभेला बसेल व ते अंतिमतः राज्याच्या हिताचे होणार नाही. डाव्या पक्षांना सध्या अनुकूल वातावरण नाही. जागोजाग धर्मांध शक्तीं आणि भांडवलदार यांची युती झाली आहे. डाव्यांच्या खच्चीकरणासाठी ते सर्व ताकद पणाला लावत आहेत. तरीही असंख्य कार्यकर्ते ठिकठिकाणी झुंज देत आहेत. त्यांनी आपापले पक्ष जिवंत ठेवले आहेत. आपले कार्य, तत्वनिष्ठा आणि प्रामाणिकपणा यांच्या बळावर जनतेत स्थान निर्माण केले आहे. त्या मानाने निवडणुकीच्या राजकारणात त्यांना यश येत नाही हे खरे आहे. पण धर्मनिरपेक्षतेसाठी ते करीत असलेल्या लढाईचा सन्मान म्हणून आघाडीच्या नेत्यांनी स्वतःहून काही जागा डाव्यांसाठी सोडणे अपेक्षित आहे. पण थोडेही यश मिळाले की शिड्या मोडून टाकणे ही आघाडीच्या काही नेत्यांची जुनी सवय आहे. ती त्यांना महागात पडू शकते. विधानसभेच्या मतदारसंघांमध्ये डाव्यांचे अगदी दोन-पाच हजारांचे मतदानही निकाल फिरवू शकेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. कामगार, शेतकरी किंवा रायगड वा सोलापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये व्यापक सर्व स्तरातील घटक इत्यादींचा पाठिंबा मिळणे हे आघाडीसाठी अत्यावश्यक आहे. पण जागावाटपाच्या मारामारीत ते याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यांना ताळ्यावर आणण्याची गरज होतीच. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पत्राने ते काम केले आहे. लोकसभेइतकीच महाराष्ट्राची लढाई महत्वाची आहे. शिंदे-फडणवीस सरकार काहीही करून सत्ता मिळवू पाहणाऱ्या धर्मांध व दलाली शक्तींचे प्रतिनिधी आहेत. त्याचा पराभव करण्यासाठी निकराचा लढा गरजेचा आहे व तो डाव्यांच्या मदतीविना लढता येणार नाही.

**विचार**

# अमेरिका भेटीतून काय साधले?

***मोदींच्या अमेरिका भेटीत पहिल्या दोन दिवसांमध्ये क्वाडचे शिखर संमेलन हा मुख्य भाग होता. एकीकडे चीनशी सीमाप्रश्नावर वाटाघाटी सुरू असतानाही आपण अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासह प्रशांत महासागर प्रदेशात एक आहोत हे याद्वारे भारताने दाखवून दिले. चीनशी कितीही जवळचे आर्थिक संबंध असले तरी सामरिक क्षेत्रात चीनची मुजोरी आपण खपवून घेणार नाही, हेच पंतप्रधानांनी या दौऱ्यातून स्पष्ट केले आहे.***

**क. अनिल आठल्ये**

तिसऱ्यांदा निवडणूक जिंकल्यानंतर पंतप्रधान मोदी आंतरराष्ट्रीय राजकारणात खूपच सक्रिय झाले आहेत. महिन्याभरापूर्वी त्यांनी रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांना भेटी दिल्या. या दोन्ही देशांमध्ये सहज जाऊ शकणारे आणि स्वागत होणारे मोदी हे जगातील एकमेव नेते आहेत. मोदींच्या सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील सहभागातून पंडित नेहरुंच्या काळाची आठवण होते. १९५० आणि १९६० च्या दशकात कम्युनिस्ट जग तसेच पाश्चात्य राष्ट्रे या दोघांशीही चांगले संबंध असणारा भारत हा एकमेव देश होता. जगातील अनेक पेचप्रसंगांमध्ये तोडगा काढण्यासाठी भारताला निमंत्रण मिळत असे. भारताच्या त्या काळाच्या परराष्ट्र धोरणाचा गाभा अलिप्तवाद हा होता. याउलट, पंतप्रधान मोदींच्या काळात सर्वच देशांशी चांगले संबंध ठेवून तेच उद्दिष्ट साध्य केले जात आहे. अर्थातच एकाच वेळी इस्त्रायल आणि पॅलेस्टिनी लोक किंवा युक्रेन आणि रशिया यांच्याशी चांगले संबंध ठेवणे ही तारेवरची कसरतच आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाने गेली अनेक वर्षे ती यशस्वीपणे केली आहे. मोदींचा सध्याचा अमेरिका दौरा याच धोरणाचा एक भाग म्हणावा लागेल.

मोदींच्या अमेरिका भेटीचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत. एका दृष्टीने पाहिले तर हे भारतीय परराष्ट्र धोरणाचेही दोन वेगळे पैलू आहेत. मोदींच्या अमेरिका भेटीत पहिल्या दोन दिवसांमध्ये 'क्वाड'चे शिखर संमेलन हा मुख्य भाग होता. एकीकडे चीनशी सीमाप्रश्नावर वाटाघाटी सुरू असतानाही आपण अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासह प्रशांत महासागर प्रदेशात एक आहोत हे भारताने दाखवून दिले आहे. कितीही जवळचे आर्थिक संबंध असले तरी सामरिक क्षेत्रात आपण चीनची मुजोरी खपवून घेणार नाही, हे पंतप्रधानांनी स्पष्ट केले आहे. भारताच्या यशस्वी परराष्ट्र धोरणाचा परिणाम म्हणजे रशियाविरुद्ध आर्थिक प्रतिबंध असूनही भारत तेल आयात करत असून याकडे अमेरिकेने कानाडोळा केला आहे. या कृतीद्वारे आपण दाखवून दिले आहे की, आपण अमेरिकेचे मित्र आहोत, गुलाम नाही. अमेरिकेलाही चीनची सामरिक नाकेबंदी करण्यासाठी भारताच्या मैत्रीविना दुसरा विकल्प नाही, हे मान्य आहे. याचाच परिपाक म्हणजे इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात भारतामध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक आणि आर्थिक गुंतवणूक करुन अमेरिका चीनवरील परावलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. त्या दिशेने मोदींच्या ताज्या अमेरिकाभेटीत अनेक करारदेखील झाले. त्यामुळे भारतात इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला प्रोत्साहन मिळून लोकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

दौऱ्याप्रसंगी मोदींनी आपल्या नेहमीच्या शिरस्त्यानुसार न्युयॉर्कमध्ये अनिवासी भारतीयांच्या संमेलनाला संबोधित केले. काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिका दौरा करुन मोदींच्या विरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता, त्याला मोदींनी छेद दिला. आपल्या परदेशी भेटींचा उपयोग स्थानिक राजकारणात करुन घेण्याबाबत मोदी पटाईत आहेत. मोदींच्या या अमेरिका भेटीमागे तीन उद्दिष्ट्ये होती. एक म्हणजे 'क्वॉड' संमेलनात भाग घेऊन चीनला गर्भीत इशारा देणे गरजेचे होते. सीमेवर तणाव कमी झाला तरी भारत अमेरिका आणि इतर लोकशाही देशांबरोबर आपली मैत्री कायम ठेवणार आहे, हा एक इशारा होता. यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदा आणि लोकशाही संकेत यावर अधिष्ठित आंतरराष्ट्रीय संबंध असावेत, यावर जोर दिला गेला. अप्रत्यक्षपणे हे सुचवले गेले की, चीन आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियम झुगारुन देत आहे तसेच त्याच्या प्रादेशिक विस्तारवादाला भारताचा कायमच विरोध राहील. एकीकडे 'ब्रिक्स'मध्ये चीनशी जुळवून घेतले असले तरी या मूलभूत मुद्द्यावर भारत पाश्चिमात्य देशांच्या बरोबर आहे, हे मोदींनी दाखवून दिले. मोदींचा दुसरा उद्देश भारतामध्ये नवीन गुंतवणुकीला चालना देणे हा होता. शिरस्त्याप्रमाणे त्यांनी अमेरिकन उद्योग जगताशी भेटीगाठीही केल्या. दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी जगाच्या भविष्याच्या दृष्टीने राष्ट्रसंघात बदल होण्याची गरज आहे, हा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ मध्ये राष्ट्रसंघ अस्तित्वात आला. एरवी शांतता प्रस्थापित करणे आदी गोंडस नावाखाली तत्कालिन प्रमुख देशांच्या हातात सर्व सत्ता देण्याचे काम राष्ट्रसंघाने केले. म्हणूनच सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व आणि इतर यात भेदभाव करण्यात आला. दुसऱ्या महायुद्धातील पाच महाशक्तींना नकाराधिकाराचा अधिकारदेखील देण्यात आला. थोडक्यात, या पाचांपैकी कोणाही एका देशाला मंजूर नसणारा कोणताही प्रस्ताव सुरक्षा परिषद पारित करु शकत नाही. हे पाच देश म्हणजे अमेरिका, सोव्हिएत युनियन, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन. राष्ट्रसंघाच्या संरचनेमुळे सुरक्षा परिषदेत कोणताही बदल करण्यास वरील पाचही देशांचा होकार असणे गरजेचे आहे. पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात हा मुद्दा अधोरेखित केला की आजची जागतिक स्थिती १९४५ पेक्षा खूप वेगळी आहे. भारतासारखा देश सुरक्षा परिषदेच्या बाहेर राहिल्यामुळे राष्ट्रसंघाचे आणि पर्यायाने संपूर्ण जगाचे नुकसान आहे. आज स्थिती अशी आहे की, सुरक्षा परिषदेतील चार देश भारताला कायम सदस्य बनवण्यास अनुकूल आहेत. अडसर केवळ चीनचा आहे. ही एक प्रकारची विडंबनाच आहे, कारण अगदी १९७० च्या दशकापर्यंत चीन सुरक्षा परिषदेचा सदस्य नव्हता आणि त्याची जागा तैवानने घेतली होती. त्यापूर्वी अनेक वर्षे पंडीत नेहरुंच्या नेतृत्वाखाली भारताने कम्युनिस्ट चीनला ही सदस्यता मिळावी यासाठी कायम पाठपुरावा केला होता. भारताच्या या मदतीचे उपकार मानणे दूरच, पण चीनने सातत्याने राष्ट्रसंघात भारतविरोधी भूमिकाच घेतली आहे. नेहरुंच्या काळात आफ्रिका आणि आशिया या खंडांचे ऐक्य घडवण्याचा प्रयत्न झाला. भारताचे हे चीनधार्जिणे धोरण त्याचाच एक भाग होता. परंतु, गेल्या काही दशकांमधील घटना बघितल्या तर चीनच्या मनात काही तरी वेगळे असल्याचे जाणवते. जगापुढील पर्यावरण आणि राजकीय समस्यांसाठी राष्ट्रसंघाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मोदींनी या दौऱ्यात केले. त्यातच सोशल मीडिया आणि त्याचे दुष्परिणाम हा जगाला भेडसावणारा एक मोठा प्रश्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. सोशल मीडियावर नियंत्रणासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न केले जावेत, असे पंतप्रधान म्हणाले. याचे कारण इंटरनेटद्वारे सोशल मीडियाचा प्रभाव आंतरराष्ट्रीय सीमांच्या पलिकडे होतो आणि कोणताही एक देश या संदर्भात काहीही करु शकत नाही. आज ज्या प्रकारे सोशल मीडियाच्या वापरामुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, तो मुद्दा मोदींनी अधोरेखित केला. सोशल मीडियाच्या अतिवापराचे सामाजिक परिणाम विकसित देशांमध्येही दिसून येत आहेत. जगाच्या लोकसंख्येचा मोठा भाग असणाऱ्या आपल्यासारख्या देशामध्ये या क्षेत्रात सर्व देशांशी मिळून काही नियंत्रणे अंमलात आणली जावीत, असे पंतप्रधानांनी नमूद केले. पंतप्रधानांची अमेरिका भेट अत्यंत नाजूक क्षणी झाली, असे म्हणावे लागेल. मध्यपूर्वेत इस्त्रायलचे लेबनॉनवर हल्ले आणखी तीव्र झाले आहेत. त्यात इराण ओढला गेल्यास मध्यपूर्वेत अणुयुद्धाचा धोका संभवतो. रशिया-युक्रेन युद्धदेखील अशाच प्रकारे अण्वस्त्रवापराच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. अमेरिकेने युक्रेनला रशियाविरुद्ध क्षेपणास्त्रे वापरण्याची परवानगी देऊन स्फोटक स्थिती निर्माण केली आहे. पंतप्रधान मोदींच्या अमेरिका भेटीदरम्यान पडद्यामागे भारताचा युक्रेन आणि रशिया युद्धातील समेटाचा प्रयत्न नक्कीच चर्चेत आला असणार. या संदर्भात अमेरिकेने काय भूमिका घेतली आणि युक्रेन रशियाशी तडजोडीच्या मनस्थितीत आहे का, या प्रश्नाचे उत्तर कालांतराने मिळेल. आता पंतप्रधान भारतात आल्यानंतर त्या दिशेने आणखी काही हालचाली होतात का, हे बघणे उद्‌बोधक ठरेल.

आंतरराष्ट्रीय राजकारण, वाटाघाटी टेलिव्हिजन कॅमेऱ्यांसमोर होत असतात तितक्याच पडद्यामागेही होतात. सर्वसामान्य जनतेला किंवा दूरवर असणाऱ्या विश्लेषकांना शितावरुन भाताची परीक्षा करावी लागते. पंतप्रधानांच्या अमेरिका भेटीत न घडलेली एक घटनाही तितकीच महत्त्वाची आहे. पंतप्रधान मोदी अमेरिकेला जाण्याआधी त्या देशाच्या राष्ट्रपतीपदाचे इच्छुक डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींशी भेट होणार, असे वक्तव्य केले होते. परंतु, २०२० मध्ये 'अबकी बार ट्रम्प सरकार' असे म्हणून पंतप्रधान मोदी तोंडघाशी पडले होते. २०२० च्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प पराभूत झाले आणि बायडन निवडून आले. त्या चुकीच्या परिणामस्वरुप भारत-अमेरिका संबंधांमध्ये थोडी कटुता आली. या वेळच्या अमेरिका भेटीत डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस या दोन्ही उमेदवारांपासून दूर राहून मोदींनी चाणाक्षपणा दाखवला. यामुळे अमेरिकेच्या राजकारणात भारत लुडबूड करणार नाही, हे स्पष्ट केले गेले. तेथील निवडणुकीत कोणीही जिंकले तरी भारत-अमेरिका संबंधांवर परिणाम होऊ देणार नाही, हेच या कृतीतून मोदींनी दाखवून दिले.

**आजकाल**

# मुस्लिम सत्यशोधक हमीद दलवाईंचे स्मरण

**सुनील तांबे**

यांना मी कधीही भेटलो नाही. अनिल अवचट हमीदने भारावून गेला होता. हमीदच्या निधनानंतर अनिल कमालीचा अस्वस्थ होता. त्या स्थितीत त्याने हमीद हे पुस्तक लिहून काढलं. अनिलचं पुस्तक, भाऊ पाध्येचा लेख आणि हमीदच्या कथा, कादंबरी आणि लिखाणातून मला हमीद भेटला.

माझे काका मुकुंद तांबे आणि काकू प्रभा तांबे यांचे हमीदशी कौटुंबिक संबंध होते. माझे वडील राम तांबे यांचेही.

मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना हमीदने केली. सत्यशोधक हा शब्द म. फुलेंशी नातं जोडणारा होता. कोणत्याही प्रकारच्या शोषणाच्या विरोधात हमीद ठामपणे उभा राह्यचा. म्हणून तर म. फुलेंशी त्याचं नातं जुळलं. त्यांच्यामुळे डॉ. बाबा आढाव, नरेंद्र दाभोलकर यांच्याशीही. दाभोलकरांनी म्हणूनच मुलाचं नाव हमीद ठेवलं.

हमीद कोकणी मुसलमान होता. त्याच्या गावात मुस्लीम लीगची स्थापना करायला उत्तर भारतातून एक मुसलमान नेता आला होता. सभा झाली. त्यामध्ये त्या मुसलमान नेत्याने जाहीर केलं की मुस्लीम लीगची स्थापना झाली. परंतु मुसलमान म्हणाले, आमच्या गावात कोणत्याही नव्या गोष्टीची स्थापना करायची तर ब्राह्मण लागतो. अखेरीस ब्राह्मणाच्या हाताने नारळ फोडून मुस्लीम लीगची स्थापना करण्यात आली. हमीदनेच हे नोंदवलं आहे.

सर्व प्रकारच्या शोषणाच्या विरोधात असल्याने हमीद वैचारिकदृष्ट्या डॉ. राममनोहर लोहियांसोबत जुळला. त्यावेळी समाजवादी पक्षात दोन गट होते. एक होता संयुक्त समाजवादी पक्ष (डॉ. लोहिया) दुसरा होता प्रजा समाजवादी पक्ष. हमीदची बहीण फातिमा खडस. आम्ही तिला फाफा म्हणतो. तिचे पती, महंमद खडस. माझी आजी (वडलांची आई) म्हणायची तिला सहा मुलगे-- पाच तिच्या पोटातून जन्मलेले आणि सहावा महंमद खडस. महंमद खडस प्रजा सोशॅलिस्ट पार्टीत होते. डॉ. बाबा आढाव हेही संयुक्त समाजवादी पक्षाचे होते. महंमदभाई सामाजिक प्रश्नांवर हमीद आणि बाबा आढाव यांच्यासोबत असायचे. महंमदभाई हे वेगळं रसायन होतं. डॉ. भालचंद्र मुणगेकर त्यांना सेंद्रीय विचारवंत - ऑरगॅनिक इंटेलेक्चुअल म्हणायचे. मुणगेकर तेव्हा युवक क्रांती दलात हुसेन दलवाई यांच्यासोबत होता. मधु दंडवतेंचा वारसदार मुणगेकर असायला हवा असं माझे वडील म्हणायचे, महंमदभाईंचंही तेच मत होतं. वास्तविक मुणगेकर वैचारिकदृष्ट्या मधु लिमयेंच्या जवळचा होता. दंडवते आणि लिमये या दोघांशीही मुणगेकरचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यावेळी मुणगेकरचा नेता हुसेन दलवाई होता. असो. हमीद दलवाईंच्या सर्व कार्यक्रमांत आणि चळवळीत समाजवादी पक्षातले दोन्ही गट सक्रीय सहभागी होते. मतभेद-मतभिन्नतेसह. त्यातच हमीद दलवाईचा संबंध साठोत्तरी साहित्याशीही होता. कथा, कादंबरी यामध्ये त्याचा दबदबा होता. भाऊ पाध्ये, अशोक शहाणे, दिलीप पुरुषोत्तम चित्रे हे त्याचे मित्र होते. मात्र हमीदने मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केल्यावर साहित्यापेक्षा समाजकारणात अधिक लक्ष घातलं. त्यासाठी तो भारतभर हिंडला. राष्ट्रीय मुसलमान ही काय चीज आहे याची झाडाझडती त्याने केली. त्यामुळे मुसलमान त्याच्यावर कमालीचे चिडले होते. त्याच्यावर कधीही हल्ला होईल अशी परिस्थिती होती. मात्र हमीद कधीही डगमगला नाही. हमीदला संगीतामध्ये कमालीचा रस होता. त्यावेळी रेकॉर्डस असायच्या. हिंदी संगीताच्या जुन्या रेकॉर्डस विकत घ्यायला हमीद चोर बाजारात (वास्तविक शोर बाजार) जायचा. तेव्हा तो त्याचं नाव-गाव सांगायचा नाही. त्यावेळी दूरदर्शन नव्हतं आणि वर्तमानपत्रात फोटोही ब्लॅक व्हाईट छापले जायचे. त्यातही क्लॅरिटी कमी असायची. आणि हमीदच्या कार्याला फारशी फोटो प्रसिद्ध मिळायची नाही त्यामुळे असेल कदाचित परंतु हमीद बिनधास्त चोर बाजारात हिंडायचा.

कर्तारसिंग थत्ते नावाचे सावरकरवादी होते. ते सटक होते. त्यांची आणि हमीदची दोस्ती होती. कडवा सेक्युलर मुस्लिम आणि कडवा हिंदुत्ववादी यांच्यातली ही मैत्री गंमतीदार होती.

हमीद लेडी कीलर आहे असं म्हटलं जायचं. बायका प्रेमात पडतील असं त्याचं व्यक्तीमत्व होतं.

तो निडर होता, सेक्युलर विचाराशी एकनिष्ठ होता.

वसंत पळशीकर त्या काळात समाजप्रबोधन पत्रिकेचे संपादक होते. त्यांना हमीदचा सेक्युलॅरिझम भावायचा परंतु त्यांनी हमीदच्या चळवळीच्या दिशेबद्दल महत्वाचे प्रश्न उपस्थित केले. हमीद आणि पळशीकर हा वाद समाजप्रबोध पत्रिकेत त्यावेळी झाला होता. हमीदसोबत होते नरहर कुरुंदकर आणि अ. भि. शहा. म्हणून तर स. ह. देशपांडे यांनी द(दलवाई)कु (कुरुंदकर)श (शहा) हे हिंदुत्ववादी विचाराला कसे पूरक आहेत अशी मांडणी केली होती. त्याचा प्रतिवाद वसंत पळशीकरांनीच केला. आज हमीद दलवाईंच्या वैचारिक भूमिकेच्या जवळ जाण्याशिवाय भारतातील मुसलमानांना पर्याय नाही आणि सेक्युलॅरिस्टांना हमीदची परंपराच पुढे न्यावी लागते. हमीदचं जीवनकार्य २० व्या शतकातलं आहे. परंतु त्याच्या कार्याचे पडसाद २१ व्या शतकातही ऐकू येतात ही त्याची थोरवी. हमीदला विनम्र अभिवादन.

**- साभार**

**लोकसंसद**

## देशात परदेशी पर्यटकांची संख्या वाढली

जभरातील सुमारे ४७ लाख ८० हजार पर्यटकांनी जून अखेर पर्यंत भारताला भेट दिली. जगभरातून भारतात पर्यटनाला येण्याचा कल वाढत चालला आहे असे चित्र आहे. अर्थात कोरोना पूर्व काळापेक्षा अद्याप पर्यटकांची संख्या कमी आहे. सन २०१९ चा विचार करता २०२३ मध्ये ९ टक्के पर्यटक कमी आले आहेत. भारतात येण्याचे मुख्य कारण म्हणजे निवांतपणा अनुभवणे व नवे प्रदेश पाहणे हाच आहे. परदेशी पर्यटकांनी भेट दिल्यास आपणास परदेशी चलनाची प्राप्ती होते. याशिवाय आपली प्रतिमा विदेशात चांगली निर्माण होते. आजही देशात अनेक किल्ले प्रसिद्ध आहेत, जागतिक पातळीवरील प्रसिद्ध आग्र्याचा ताजमहाल, कर्नाटकातील हम्पी सामाज्य केरळ मधील भव्य समुदकिनारे संभाजी नगरातील वेरूळ व अजिंठा येथील लेणी, राजस्थानातील प्रेक्षणीय राजवाडे,विविध ठिकाणी असलेले प्राचीन संदर्भ याचा मोठा खजिना भारतात आहे. बांगला देशात १ जुलैपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु असल्याने भारताने व्हिसा देणे बंद केले होते. कोरोना काळात पर्यटकांचा ओघ कमी झाला होता. आता ही संख्या वाढत चालली आहे. अनेक लोक देशातील अनेक ठिकाणे पाहण्यावर जोर देत आहेत. याला विदेशी पर्यटकांची जोड मिळाल्यास देशातील अनेक लोकांना याचा फायदा होईल. सरकारने जास्तीत जास्त प्रचार करून विदेशी पर्यटक कसे भारतात येतील हे पाहण्याची गरज आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१ ऑक्टोबर**

**१८६७ :-** लेखक सखाराम हरी गोलतकर यांचा जन्म. 'भावाचे बोल' ह्या कादंबरीसह 'भंडारी जातीचा इतिहास' हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांच्या नावावर आहे. **१८८७ :-** संगीत, शास्त्र, कला या त्रयीवर प्रभुत्व गाजवणारे लेखक गणेष हरी रानडे यांचा जन्म. 'संगीताचे आत्मचरित्र, हिंदुस्थानी संगीत' ही पुस्तके त्यांच्या नावावर आढळतात. **१९०१ :-** मारवाडी असूनही मराठी साहित्याची अतोनात गोडी असणारे लेखक बुलासा मोदी यांचे वयाच्या अवघे ३२व्या वर्षी निधन. अर्वाचीन मराठी वाङ्:मयाची समालोचन करणारी 'मराठी भाषेची सद्यस्थिती' ही लेखमाला त्यांनी लिहिली. त्यांच्या अकाली निधनाने एका चोखंदळ वाङ्:मयसेवकाला मराठी साहित्य मुकले. **१९०२ :-** गणितज्ञ आणि या विषयावरील एक सिद्धहस्त लेखक नारायण हरी फडके यांचा जन्म. 'भारतीय गणिती' या पुस्तकातून थोर भारतीय गणितज्ञांचा परिचय. तसेच 'लीलावती' या संस्कृत गणिती ग्रंथाचे 'लीलावती पुर्नदर्षन' हे मराठी भाषांतर आणि विश्वकोषातही गणित व ज्योतिषशास्त्र या विषयावर लेखन केले. याशिवाय 'सृष्टीज्ञान' मासिकात अनेक लेख प्रसिध्द. **१९०५ :-** गत पिढीतील एक ज्येष्ठ लेखिका मालतीताई बेडेकर पूर्वाश्रमीच्या बाळूताई खरे यांचा जन्म. विभावरी शिरुरकर या टोपणनावाने मोठ्या प्रमाणात लेखन. स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा, हिंदू व्यवहार धर्मशास्त्र ही पुस्तके. 'कळयांचे नि:श्वास' हा कथासंग्रह तर वैवाहिक जीवनावर बेतलेली 'हिंदोळयावर' ही त्यांची गाजलेली कादंबरी, गुन्हेगार जातीजमातीचे हृदयद्रावक चित्रण 'बळी' या कादंबरीतून रेखाटले. तसेच सुधारणावादी विचारसरणीच्या आपल्या वडिलांचे चरित्र 'खरे मास्तर' या नावाने साकारले. याशिवाय 'घराला मुकलेल्या स्त्रिया व काळाची चाहूल', 'मनस्विनीचं चिंतन' असे वैचारिक स्वरुपाचे लेखनही त्यांनी केले. एकंदरीत समाजातील पिडीत वर्गाबलची आत्मीयता त्यांच्या लेखणीतून दिसून येते. **१९१९:-** महाराष्ट्राचे वाल्मीकी, गीतरामायणकार, कथाकार, उत्तम वक्ते, लेखक, अभिनेते ग.दि. माडगूळकर यांचा जन्म. चित्रपटकथा, पटकथा, संवाद, गीते आदी क्षेत्रांत अवीट ठसा उमटवला. गदिमांच्या 'गीतरामायण'ने इतिहास घडवला. व्यक्तिचित्रे, ललितलेख, लघुकथा, दीर्घकथा, प्रवासवर्णन, बालकथा आदी साहित्याच्या सर्व दालनांत त्यांचा मुक्त वावर होता. **१९२८:-** पतंजलीयोग, पुर्नजन्म, ओशो, ध्यान, अध्यात्म आदी विषयांवर लेखन करणारे लेखक स्वामी आनंद ऋषी यांचा जन्म. 'पातंजलयोग दर्शन - एक अभ्यास', 'पुर्नजन्म: कल्पना की वास्तव' ह्या महत्त्वपूर्ण ग्रंथासह 'मला उमजलेले ओशो', 'ध्यानप्रचिती', 'दहा हजार बुद्धासाठी शंभर कथा' मिळून १२ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९३१ :-** कथालेखिका डॉ. सुमती पंडित कुलकर्णी यांचा जन्म. 'परिपाक भाग १,२', 'मधुमालती', 'सुमतिगंध' हे अनुक्रमे अ. भा. वर्टी, मालती दांडेकर, सुमती क्षेत्रमाडे यांच्या कथांचे संपादन त्यांनी केले. तसेच 'मनोरा' या मासिकाचे संपादनही त्यांनी केले. **१९३३ :-** विविध नियतकालिकांतून लेखन करणारे लेखक प्रभाकर श्रीधर राठी यांचा जन्म. 'शततारका' हा विनोदी लेखनसंग्रह त्यांच्या नावावर जमा आहे. **१९३४ :-** कवी श्रीनिवास रामचंद्र बोबडे यांचा जन्म. त्यांची कविता 'बोबडे' यांची कविता या संग्रहात समाविष्ट असून शृंगारशतक या काव्याचे १०१ श्लोक त्यात अंतर्भाव आहेत. 'जाग जाग जाग सखे', 'उजळल्या दिशा' या सारखी अनुपन गीत रचना त्यांनी केली. 'हिंदूस्थान', 'आमचा क्षोम' या सारख्या त्यांच्या कविता राष्ट्रीय भावनेचा अविष्कार करतात. 'श्रीराम' या टोपणनावाने लेखक केले. **१९३६ :-** लेखिका प्रा. रेखा यशवंत मोराणे यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'उन्मेष' हा काव्यसंग्रह तसेच 'सूर संगीतिका', 'श्रीपद् भागवत सार - महर्षी वेद व्यास प्रणित भागवत पुराणातील १२ स्कंदातील कथा व तत्त्वज्ञान इ. ग्रंथ संपदा. **१९७२ :-** कोशकार, सुभाषित संग्राहक लक्ष्मण गोविंद विंझे यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# वि.खं. विद्यालयात शिक्षक संवाद मेळावा




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शिक्षक आमदार म्हणून काम करत असताना तुम्हा सगळ्यांची मला मोलाची साथ लाभली आहे. पनवेल पंचायत समितीचा सभापती त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण व आरोग्य विभागाचा सभापती आणि रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष या पदांवरती काम केल्याचा अनुभव असल्यामुळे कोकण शिक्षक मतदार संघाचे मी यशस्वीपणे राज्याच्या विधान परिषदेत प्रतिनिधित्व करू शकलो. जिल्हा परिषदेतील निधी विनीयोगाच्या अनुभवामुळेच माझ्या आमदार निधीचा परिपूर्णरित्या वापर करून शाळांना संगणक, प्रिंटर्स, ई लर्निंग साहित्य, शैक्षणिक साहित्य देऊ शकलो याचे समाधान आहे. मला समाधान आहे की मी ६० हजार शिक्षकांना अनुदान सुरू करून देऊ शकलो, असे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले.

ते पनवेल तालुका पुरोगामी शिक्षक आघाडीच्या वतीने पनवेलच्या वि. खं.विद्यालयात रविवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी संवाद मेळाव्यात बोलत होते. शेकडोच्या संख्येने उपस्थित रहात शिक्षक बांधवांनी या संवाद मेळाव्याला उदंड प्रतिसाद दिला.

बाळाराम पाटील पुढे म्हणाले की, पनवेल तालुक्यामध्ये के.जी.पासून पी.जी. पर्यंत अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. अर्थातच त्यामुळे पनवेल तालुक्यात शिक्षक बांधवांचे लक्षणीय प्रमाण आहे. या शिक्षकांनी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आणि संस्थाचालकांनी जर का मला साथ दिली तर पनवेलचे नष्टचक्र दूर करण्यासाठी जराही वेळ लागणार नाही. रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघटनेचे माजी पदाधिकारी व्हि. ए. पाटील यांनी प्रास्ताविक सादर केले.

---

## कर्जत नगरपरिषद, कर्जत
**पाणीपुरवठा विभाग**
**ई-निविदा सूचना - २०२४ २०२५**

कर्जत नगरपरिषद, कर्जत जि-रायगड यांजकडून पुढील प्रमाणे कामासाठी १) कर्जत नगरपरिषद हद्दीतील विश्वनगर पंप हाउस येथे संरक्षण भिंत बांधणे. २) कर्जत नगरपरिषद हद्दीतील विश्वनगर पंप हाउस येथील पंप दुरुस्ती करणे. ई-निविदा अनुभवी मक्तेदार, अहर्ताप्राप्त तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेकडून नगरपरिषद हद्दीतील कामांकरिता ऑनलाईन पध्दतीने मागविणेत येत आहेत. ई-निविदा संच : http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक- १/१०/२०२४ ते दिनांक- ७/१०/२०२४ उपलब्ध आहेत.

सही/-
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

---

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

पनवेल महानगरपालिकेत Property Tax Revenue Enhancement Management system संगणक प्रणाली कार्यान्वति व प्रस्थापित करणेकामी सदरकामी अंदाजपत्रक बनविणेकरिता बाजारभाव मागविण्यात येत आहेत. तरी निविदाधारक यांनी नमूद करण्यात कामाचे दर हे अंदाजपत्रक बनविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागात विहित मुदतीत जमा करण्यात यावे. याकामासंबंधीचा सविस्तर तपशील माहिती व तंत्रज्ञान विभागात उपलब्ध आहेत. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

मुदत :
पमपा/मातंवि/३०२४/प्र.क्र.३३/४३३/२०२४
दिनांक: २८/०९/२०२४

सही/-
**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यानी मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| मार्कस डौमीनिक कुटो | १७८ | ६/ड | ०-७१-०० | ०-७१ |
| | १७८ | १३/ब | १-८१-६६ | १-२९ |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. १/१०/२०२४.
**अॅड. निलेश रखमाजी पादीर**
मो.- ९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**अॅड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०७६७५६८

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र. अर्ज ८४/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. रोहित विजय तांबे
मु. पेढांबे, ता. अलिबाग, — अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत पेढांबे — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे पेढांबे, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आजी कै. सुमित्रा सिताराम तांबे यांना मृत्यू दि. १७/०८/२०२१ रोजी मौजे पेढांबे, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत पेढांबे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत पेढांबे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र रामचंद्र परकर व सौ. राजश्री राजेंद्र परकर, दोघे रा.थेरोंडा-खंडेराव पाडा, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे स्नेही श्री.लाभेश रमेश घरत, रा. थेरोंडा-पानसेवाडी, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | जु.स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा | १२७/१/५ | | ०-०५-१० | १.१२ |
| ता. अलिबाग | | पो.ख. | ०-०१-५० | |
| | | एकूण | ०-०६-६० | |

या बागायत मिळकतीपैकी ०-०३-०० हे.आर. क्षेत्राबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०९/२०२४

सही/-
**जयवंत दत्तात्रेय म्हात्रे**
पत्ता : रा. थेरोंडा (धाकलीवाडी),
पो. चौल ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमच्या आशिल सौ. दिपाली प्रसाद धनगर यांने मौजे तिवरे, ता-कर्जत, जि-रायगड येथील जमिन मिळकत त्या मिळकतीच्या मालक श्रीमती मनिषा प्रकाश चव्हाण यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| सर्वे नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १६ | १ | ०.४०.०० पैकी विक्री करणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.२४.०० | ३.५४ |

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बॅक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: ०१/१०/२०२४

वकील
**अॅड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५०७

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यानी मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री.अकाशकुमार मोहनलाल जैन | १३६ | १/अ | ८-३०-०० | ६-१४ |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. १/१०/२०२४.
**अॅड. निलेश रखमाजी पादीर**
मो.९७६७६३७१००
९२७२५६२१५८

**अॅड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.९८५०७६७५६८

---

CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## PUBLIC NOTICE

### Final NAINA Town Planning Scheme, No. 4
(Part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad)
(under Section 72(7) of the Maharashtra Regional &Town Planning Act, 1966
read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules. 1974)
No. ARB/TPS-4/Final Award/2024/861

Whereas, the draft NAINA Town Planning Scheme No. 4 at part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub-section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') vide Notification No. CIDCO/NAINA/TPS-4/Draft Scheme/2022/563; dated 21st October 2022, in exercise of the powers delegated by the Urban Development Department vide Notification No.TPS-1817/973/CR-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 4th November 2022 on page No. 1 to 6.

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri. Shrirang D. Landge, retired Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No. TPS-1222/2152/ C.R.148/22/UD-12 dated 2nd December 2022 under sub-section (1) of Section 72 of the said Act. The said Notification has been published in Maharashtra Government Gazette, Konkan Division supplement, Part – I, dated 23-29 March, 2023 on page No.1 & 2.

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No. 13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared under his notice dated 5th April 2023 published in Maharashtra Government Gazette, Extraordinary; Part-II, dated 25th April 2023 that, he has commenced the duties as Arbitrator in respect of the NAINA Town Planning Scheme No. 4 part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad with effect from 5th April 2023.

And whereas, the special notices in the prescribed form No. 4 have been served to each and every owner of the lands included in the said scheme & their hearings with recording minutes thereof in this respect have been completed.

And whereas, the NAINA Town Planning Scheme No. 4 at part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad has been sub-divided by the Arbitrator into Preliminary Scheme & Final Scheme on 20th October 2023 as provided under sub-section (3) of section 72 of the said Act.

And whereas, the Arbitrator has prepared and drawn up the Preliminary NAINA Town Planning Scheme No. 4 at part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad, on 30th November 2023 and submitted to the Government within prescribed time limit, which has been sanctioned under section 86(1) of the said act, by the State Government vide Urban Development Department Notification No. TPS-1224/03/CR-20/24/UD-12 dated 28th February 2024 and shall come into force after one month from the date of publication of this notification in the Maharashtra Government Gazette as per section 86(2)(b) of the said Act.

And whereas, the Arbitrator has now followed the procedure prescribed in Rule no. 13 of the said Rules, and has carried out the duties laid down in sub-section (6) of section 72 of the said Act.

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Final NAINA Town Planning Scheme No. 4 at part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar Raichur and Pali Devad has been drawn up by him on 12th September 2024 as provided under sub-section (7) of section 72 of the said Act read with rule 13 (9) of the said Rules.

The Final Scheme so drawn up by the undersigned has been published and copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the office of the Arbitrator and of the Special Planning authority, NAINA, at 7th floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai. This shall also be made available on website of CIDCO (https://cidco.maharashtra.gov.in).

Date : 12th September 2024
Place : NAINA Office, 7th floor, Tower No. 10,
Belapur Railway Station Complex,
CBD Belapur- 400 614.

**S. D. LANDGE**
**Arbitrator**
NAINA Town Planning Scheme No. 4.
At part of Villages Adai, Akurli, Nevali, Shilottar,
Raichur and Pali Devad

## जाहीर सूचना

### अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ४,
**(मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग))**
**(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(७) सहित**
**महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९) अन्वये)**
**क्र. लवाद/नरयो–४/अंतिम परियोजना निवाडा/ २०२४/८६१**

ज्याअर्थी, प्रारुप नैना नगर रचना परियोजना क्र. ४,(मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी, नगर विकास विभागाने दि. १३ सप्टेंबर २०१७ च्या अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/१७/नवि–१३, अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८ (२) (यापुढे उक्त अधिनियम असा उल्लेख केलेला) अन्वये अधिसूचना क्र.सिडको /नैना/न.र.यो.४/प्रा.यो./२०२२/५६३ दिनांक २१/१०/२०२२ रोजी मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग–२ मधील पृष्ठ क्र. १ ते ६ वर दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोटकलम (१) प्रमाणे, उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २ डिसेंबर २०२२ रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीएस– १२२२ / २१५२ / प्र.क्र.१४८ / २२ / नवि–१२, अन्वये, श्री. श्रीरंग दि. लांडगे, निवृत्त संचालक, नगर रचना यांची लवाद म्हणून नेमणूक केली आहे. सदर नियुक्तीची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र कोकण विभाग पुरवणी, भाग – १, पृष्ठ क्र. १ व २ वर दिनांक २३–२९ मार्च, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग–२ मध्ये दिनांक २५ एप्रिल २०२३ रोजी सुचना प्रसिद्ध करुन नैना नगर रचना परियोजना क्र. ४,(मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ५ एप्रिल २०२३ पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त परियोजनेमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक जमीन मालकांना विहीत नमुना क्र. ४ मधील विशेष नोटीस बजावण्यात आलेली असून त्यांच्या सुनावणीचे काम पूर्ण झालेले आहे. त्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी नैना नगर रचना परियोजना क्र. ४,(मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)) हीची उक्त अधिनियमाच्या कलम ७२ चे पोटकलम (३) अन्वये दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी प्राथमिक योजना व अंतिम योजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी लवाद यांनी प्राथमिक नैना नगर रचना परियोजना क्र.४ (मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)) विहित मुदतीमध्ये दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी तयार केलेली आहे व ती आता शासनाने नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस–१२२४/०३/प्र.क्र. २०/२४/ नवि–१२, दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ८६(१) अन्वये मंजूर केलेली असून, उक्त अधिनियमाच्या कलम ८६(२)(ख) नुसार, सदरची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीनंतर अंमलात येईल.

आणि ज्या अर्थी, सदर लवाद यांनी उक्त नियमांच्या नियम (१३) प्रमाणे आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (६) प्रमाणे आवश्यक असलेली सर्व कर्तव्ये पार पाडलेली आहेत.

त्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार लवाद म्हणून याद्वारे असे जाहीर करीत आहेत की, अंतिम नैना नगर रचना परियोजना क्र. ४, (मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)) ही उक्त नियमांच्या नियम क्र. १३ (९) सहीत उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) अन्वये दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी तयार झालेली आहे.

निम्नस्वाक्षरीकार यांनी वरीलप्रमाणे तयार केलेली उक्त अंतिम परियोजना ही प्रसिध्द करण्यात आलेली असून त्याच्या प्रती जमीन मालक व जनता यांच्या अवलोकनार्थ लवाद यांचे तसेच विशेष नियोजन प्राधिकरण नैना यांचे सातवा मजला टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात कामकाजाचे वेळेत ठेवण्यात आलेल्या आहेत. ही सुचना सिडकोच्या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध राहील. (https://cidco.maharashtra.gov.in).

**दिनांक– १२ सप्टेंबर २०२४**
**पत्ता : नैना कार्यालय, टॉवर नं. १०,**
**सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन,**
**सीबीडी बेलापूर– नवी मुंबई – ४००६१४**

**(श्रीरंग दि. लांडगे)**
लवाद
नैना नगर रचना परियोजना क्र. ४
(मौजे आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग),
शिल्लोतर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग))

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

CIDCO/PR/255/2024-25

## पान १ वरुन

### ‘मिथुन दा’ना दादासाहेब फाळके पुरस्कार

चित्रपटसृष्टीत अत्यंत मानाचा मानला जाणाऱ्या दादासाहेब फाळके पुरस्काराची मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घोषणा केली आहे. चित्रपटसृष्टीत अतुलनीय योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येतो. अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांनी चित्रपटसृष्टीवर बराच काळ अधिराज्य केलं. त्यांच्या डिस्को डान्सचे चाहते तर परदेशातही आहेत. आपली संवाद शैली, नृत्य, अभिनय याच्या जोरावर त्यांनी हिंदुस्थानी चित्रपट सृष्टीत एक ओळख निर्माण केली. सोबतच देशापरदेशात हिंदी चित्रपट सृष्टीची मोहर उमटवली. यामुळे यंदाचा दादासाहेब फाळके पुरस्कार त्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याआधी २०२४ मध्ये त्यांना देशातील नागरी पुरस्कातील एक पद्मभूषण पुरस्कार ही मिळाला होता. तसेच तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवरही त्यांनी आपलं नाव कोरलं आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील आधारित चित्रपटात रामकृष्ण परमहंस यांची त्यांनी केलेली भूमिकादेखील चांगलीच गाजली होती. त्या भूमिकसाठी त्यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं होतं.

### आज पेझारीत महिलांचा संवाद मेळावा

शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्याकडून उपस्थित महिलांना संबोधित केले जाणार आहे. या मेळाव्यात प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### जनता त्रस्त, प्रशासन सुस्त

कॉलेजला याच रस्त्याने जातात. चौल व रेवदंडा या ऐतिहासिक शहरांना याच रस्त्याने जोडण्यात आलेले आहे. कमी कालावधीच या ठिकाणी जाता येते. आग्राव कोळी वाड्यातील कोळी महिलांना मासे विक्रीसाठी ग्रामीण भागात येण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे. मात्र, तो रस्ताही शेवटच्या घटिका मोजत आहे.

या ग्रामीण भागांतील नागरिकांचे हातावर पोट आहे. शेती आणि मासेमारी तसेच दुग्ध व्यवसाय करणे हा येथील नागरिकांचा व्यवसाय आहे. या विभागातील नागरिकांसाठी शेती, शिक्षणासाठी जवळची बाजारपेठ म्हणून चौल-रेवदंडाची बाजारपेठ आहे. उदरनिर्वाहासाठी तसेच जे मोलमजुरी, मासेमारी, दुग्ध व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, ते सध्याच्या स्थितीमध्ये या रस्त्यावरून जाऊच शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

पूर्वी हा रस्ता २० मीटर रूंदीचा होता. आता रस्ता जेमतेम दोन मीटरचा राहिला आहे. सदरच्या रस्त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. इ.स. पूर्व चौलचे बंदर हे आंतरराष्ट्रीय बंदर होते. त्यावेळी चौलच्या बंदरामध्ये परदेशात माल पाठविण्यासाठीही रोह्यावरून आणलेल्या मालाची याच रस्त्यावरून ने-आण केली जायची. या विभागातील २३ गावांतील नागरिकांना त्यांच्या शेती व शेतीपूरक व्यवसायांना गती देणारा हा एकमेव रस्ता आहे. सदरचा रस्ता नसल्यामुळे वावेवरून वळसा मारून जावे लागत असल्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा नाहक वाया जात आहे.

गावांतील लोकांची आर्थिक उलाढाल घडवून आणणारी चौल भोवाळे येथील दत्ताची यात्रा डिसेंबरमध्ये पाच दिवस भरते. या यात्रेमध्ये कोट्यवधी रूपयांची उलाढाल होते. परंतु, सदरचा रस्ताच नसल्यामुळे येथील नागरिकांना त्याचा फायदा होत नाही. अनेक विद्यार्थी रेवदंडा कॉलेजला जाण्यापासून वंचित राहात आहेत.

### विद्यार्थी, शिक्षकांचे दायित्व ‘डेक्कन’चे

नियुक्तीकर्ता म्हणून संस्थेची असून, संस्थेने वेतन थांबविणे योग्य नाही, असा निष्कर्षदेखील या सुनावणीदरम्यान काढण्यात आल्याची माहिती थळ आरसीएफचे प्रभारी मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक महेश पाटील यांनी दिली.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे आणि आरसीएफ व्यवस्थापन यांच्यातील अंतर्गत करारानुसार आरसीएफ वसाहत कुरुळ येथे गेली ४३ वर्षे शाळा सुरू आहे. मात्र, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून शाळेसंदर्भात आरसीएफसोबत करार नूतनीकरण करण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांनी असमर्थता दाखविली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या भूमिकेमुळे या शैक्षणिक वर्षापासून पुढे शाळा सुरू ठेवण्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली.

या अनिश्चित परिस्थितीमध्ये शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने आरसीएफ व्यवस्थापनातर्फे डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांना शालेय व्यवस्थापन सुरू ठेवण्याबाबत वारंवार विनंत्या करण्यात आल्या. मात्र, करार नूतनीकरण न करण्याबाबत डेक्कन एज्युकेशन सोसायटी ठाम राहिल्याने आरसीएफ व्यवस्थापनातर्फे शिक्षण विभागामार्फत विविध स्तरावर प्रयत्न करण्यात आले. तसेच डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापनांतर्गत शाळा सुरू ठेवण्यासाठी उच्च न्यायालयात दाददेखील मागण्यात आली.

या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांच्या कार्यालयाद्वारे शाळेच्या व्यवस्थापनाबाबत २६ सप्टेंबर रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान शाळेचे व्यवस्थापन डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांनी सुरू ठेवावे, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. शाळेतील एक हजार १८० विद्यार्थी तसेच ८० शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे दायित्वदेखील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे असल्याचे या निष्कर्षात नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र खासगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम, १९७७ कलम ४.३ नुसार कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे ही प्राथमिक जबाबदारी नियुक्तीकर्ता म्हणून संस्थेची असून, संस्थेने वेतन थांबविणे योग्य नाही, असा निष्कर्षदेखील या सुनावणीदरम्यान काढण्यात आल्याची माहिती महेश पाटील यांनी दिली.

**..तोपर्यंत वेतन रखडणार**

वेतन देण्याबाबत उपसंचालकांनी आदेश दिले आहेत. परंतु, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन वेतानाच्या बिलावर स्वाक्षरी करीत नाही तोपर्यंत वेतन रखडलेलेच राहणार, अशी माहिती आरसीएफ शाळेतील सूत्रांकडून देण्यात आली.

### मेहनतीच्या बळावर कमावली वर्दी

हर्षल कैलास पालांदे ठाणे पोलीस, तर भाग्यश्री कैलास पालांदे रायगड पोलीसमध्ये नुकतीच भरती झाली आहे. वडील शेतकरी असून, त्यांनी आपल्या मुलांना शिकवण्यासाठी खूप मेहनत केली आणि अजूनसुद्धा करत आहेत. हर्षलने सांगितले की, ते एकूण पाच भावंडे, चार बहिणी आणि तो एक भाऊ. घरची परिस्थिती अतिशय बिकट असताना दोन्ही बहीण भावाने पोलीस व्हायचं ठरवलं. पण, पोलीस भरतीची कसलीच माहिती नव्हती. त्यामुळे अधिक माहित काढून कोचिंग क्लास लावण्याचा निर्णय घेतला. पण, त्यासाठी पुरेसे पैसे नव्हते. पण, कुठून तरी जमवाजमव केली, घरच्यांची परवानगी घेऊन, त्यांच्या सहमतीने पोलीस भरतीचा प्रवास सुरु झाला. मात्र, जबाबदाऱ्या संपल्या नव्हत्या. शेती व घरचा दुधाचा धंदा सांभाळून सगळं करायचं होत. आम्ही दोघांनी ठाम निर्णय घेतला होता. कितीही अडचणी आल्या तरी आपण यावर मात करून पोलीस होणारच.

### पुरवठा अधिकाऱ्यांचा शंभर टक्केचा दावा खोटा

त्यात साखर ४० हजार, रवा चाळीस हजार, मैदा चाळीस हजार व सोयाबीन तेल २८ हजार इतके जिन्नस प्राप्त झाले आहेत. तालुक्यातील ९७ दुकानांपैकी ६३ दुकानांमध्ये हा शिधा पोहोचला आहे. उर्वरित ३४ दुकानांमध्ये शिधा देणे शिल्लक राहिले आहे. त्यामध्ये १२ हजार सोयाबीन तेल येणे शिल्लक राहिले आहे.

नुकतीच जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांच्याशी आनंदाच्या शिधाबाबत माहिती घेण्यात आली. त्यांनी आनंदाचा शिधा उरण व अलिबाग तालुक्यात शंभर टक्के पोहोचला असल्याचे सांगितले होते. परंतु, प्रत्यक्षात मात्र शंभर टक्के शिधा तालुक्याला प्राप्त झालाच नसल्याचे समोर येत आहे. रवा, साखर, मैदा, सोयाबीन तेल या चार जिन्नसमधील सोयाबीन तेलाचे जिन्नस अपूर्णच असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. चुकीची माहिती देऊन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न यातून केल्याचे दिसून येत आहे.

अजून किती दिवस शिधाधारकांना प्रतीक्षा करावी लागणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शासनामार्फत निवडण्यात आलेल्या ठेकेदाराकडून आनंदाच्या शिधाचे जिन्नस शंभर टक्के येत नसल्याने ते ग्राहकांपर्यंत पोहोचविणे कठीण होऊन बसले आहे. तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी कार्यालयालासह तालुक्यातील रास्त भाव दुकानांनादेखील शिधाधारकांच्या रोषाला बळी पडावे लागत आहे.

### देशी गाय राज्यमाता-गोमाता घोषित

अशातच आता महाराष्ट्र सरकारनेही देशी गायीला राज्यमाता म्हणून घोषित केलं आहे.

राज्य सरकारने काढलेल्या आदेशात गायीचे महत्त्व सांगण्यात आले आहे. आयुर्वेदिक चिकित्सा पद्धती आणि पंचगव्य उपचारात गायीचे योगदान अमूल्य मानले जाते. गाईचे दूध, मूत्र, शेण, तूप आणि दही यांचा समावेश असलेली पंचगव्य पद्धत विविध रोगांवर उपचार करण्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय सेंद्रिय शेतीमध्येही गोमूत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

हिंदू धर्मात गायीला विशेष स्थान आहे. तिला मातेचा दर्जा देण्यात आला असून, धार्मिक विधींमध्ये तिची पूजा केली जाते. गोमूत्र आणि शेण पवित्र मानले जाते. तसेच ते विविध धार्मिक समारंभात वापरले जाते. गायीचे दूध केवळ शारीरिकदृष्ट्या फायदेशीर नाही, तर ते आध्यात्मिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे मानले जाते. भारतात गायीचा नेहमीच आदर केला जातो. वैदिक काळापासून आजपर्यंत गायीकडे धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख म्हणून पाहिले जाते. गायीमध्ये देवी-देवता वास करतात, असे मानले जाते. म्हणून तिला मातेचा दर्जा देण्यात आला आहे.

## स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य-सुरज तांडेल

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



चाणजे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील स्थानिक भूमीपुत्रांना मिळालेल्या ठेकेदारी कामात जासईकरांना कामे हवी आहेत. स्थानिक ठेकेदारांनाच परप्रांतीय ठरवून कामांची मागणीसाठी आंदोलनकर्त्या जासईकरांची दादागिरीची भाषा यापुढे खपवून घेतली जाणार नाही.जशास तसे उत्तर देऊ.त्यामुळे आधी चाणजे हद्दीतील प्रकल्पात स्थानिकांना रोजगार,व्यवसायात प्रथम प्राधान्य त्यानंतरच परिसरातील इतरांना कामे देण्याची परखड, रोखठोक भूमिका सुरज तांडेल यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मांडली.

उरण येथील बंदरातून कोळशाची वाहतूक करणाऱ्या कंपनीतील ठेक्यावरुन स्थानिक भुमीपुत्रातच संघर्ष उफाळून आला आहे.शनिवारी (दि.२८) उरण -पनवेल लॉरी मालक-चालक संघटनेने चाणजे येथील कोळशाची वाहतूक करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्तांना परप्रांतीय ठरवून वाहतूक बंद करण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पत्रकार परिषद घेऊन कोळशाची वाहतूक करणाऱ्या ठेकेदारीच्या कामात सहभागी करून न घेतल्यास सोमवारपासून कोळसा वाहतुकीच्या अवजड गाड्या रस्त्यातच रोखून धरण्याचा निर्णयही संघटनेने जाहीर केला आहे. उरण -पनवेल लॉरी मालक-चालक संघटनेच्या आंदोलनाच्या भूमिकेनंतर सुरज तांडेल यांनी पत्रकारांशी संवाद साधताना स्थानिकांची भूमिका परखडपणे मांडली.

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मे.ऑलिव्ह एंटरप्राईजेस तर्फे भागीदार श्री. गिरीष कासट, प्लॉट नं.०८, सेक्टर १९. नविन पनवेल (पु). | ०२ Pink Tabebuia झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.०८, सेक्टर -१९, नविन पनवेल (पु) या प्लॉटच्या आवारातील ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २. | श्री. सतीश अंबाजी पाटील, टेभोंडे गाव, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ वड व ०१ उंबर अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.६२, सेक्टर-१०, कामोठे या प्लॉटच्या आवारातील ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३. | अध्यक्ष, रिव्हरलॅन्ड को - ऑप हौ. सोसा. लि., प्लॉट नं. ५१७ - बी/४, बंदर रोड, पनवेल व इतर (प्लॉट नं.५१७ - बी) बंदर रोड, पनवेल. | ०१ पाम झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील रिव्हरलॅन्ड को-ऑप हौ.सोसा. लि., प्लॉट नं.५१७-बी/४, बंदर रोड, पनवेल येथील सोसायटी समोर सार्वजनिक जागेमध्ये ०१ पाम झाड अत्यंत धोकादायक स्थितीत असुन पडण्याची शक्यता आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(स्वरूप खारगे)**
**सहा.आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र.६४/६८४/२०२४
दिनांक : ३०/०९/२०२४

## सुतारवाडीत मोबाईल नेटवर्कची समस्या

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

सुतारवाडी आणि अन्य परिसरामध्ये मोबाईलच्या नेटवर्कची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेकांची कामे ठप्प झाली आहेत. सुतारवाडी परिसरात पूर्वी बीएसएनएल, डोकोमोचे नेटवर्क होते. त्यामुळे अनेक मोबाईलधारकांनी बीएसएनएल आणि डोकोमोचे सिम कार्ड टाकले होते. मात्र काही महिने हे सिम कार्ड चालले त्यानंतर जिओने या ठिकाणी आपल्या बसताना मांडले. जिओने सुद्धा काही काळ आपली सेवा चांगली दिली. त्यानंतर ही सेवासुद्धा आता कोलमडली आहे.

येथील परिसरातील सिम कार्डधारक वैतागले आहेत. आता नेम के कोणते सिम आपल्या मोबाईलमध्ये टाकावे या विवंचनेत सर्व ग्राहक आहेत. आणखी कोणते नवनवीन टॉवर या ठिकाणी होतील आणि सिम कार्ड टाकावे लागतील याबाबत सर्वत्र चर्चा चालू आहे. मोबाईलचे नेटवर्क नसल्यामुळे अनेकांना अडचण भासत आहे. याकडे टॉवरधारक दुर्लक्ष करत असल्यामुळे येथील मोबाईल कार्डधारकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ म.प्र -१, दि. १८/१०/२०२३

**परिशिष्ट- ३**

**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.**

**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड**

**ई-मेल :-eerid२४@gmail.com २४. दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७**

**निविदा सूचना क्र.३३ सन २०२४-२५ (दुसरी मागणी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं. ४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ : https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास : https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु (G.S.T. & royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुनाडे लघु पाटबंधारे योजना. ता. उरण, जि. रायगड धरणाच्या अधो बाजूकडील आवश्यक ठिकाणी संकल्पानाप्रमाणे अश्मपटल भराव दुरुस्ती व रॉक टो व टो ड्रेन व इतर अनुषंगिक काम करणे. | ५१,४१,३५७/- | ६२,६००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- रु.२३६०/- जी.एस.टी.सहित (ना-परतावा) | वर्ग-४- अ व त्यावरील |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.०१/१०/२०२४ ते दि.०८/१०/२०२४**

**ई-निविदा उघडण्याचा दि.१०/१०/२०२४**

**खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ :https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल : eerid२४@gmail.com.
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याची किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि.मिलींद पवार )**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग,**
**कोलाड.**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/११०**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत.** ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- **वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे.** संपर्क-९७६२७७७९७५.
- **दुकान गाळा भाड्याने देणे आहे.** अलिबाग एसटीस्टँडजवळ ७०३८०९४०८९
- **Shop For Sell Near Alibag** St Stand 9764548679
- **नांदगाव-मुरूड येथील कॉटेज** श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्त्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क - ९७६९४७४०६३
- **अलिबागमधील नामांकित मोटार** ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : ९८२३४९२६२६/७९९८६१९१९१
- **इंटरनॅशनल फास्ट फूड कॅफे** मध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत ( अनुभवाची गरज नाही) Five star chicken अलिबाग कामाची वेळ : दुपारी १ ते रात्री ११ (पगार ९०००/-) पार्ट टाइम जॉब : संध्याकाळी ५ ते रात्री ११ ( पगार ६०००/-) संपर्क : call ९६१९३८३२२३/ Whatsapp ८९२८७५५८९५
- **अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या** कामासाठी मावशीची (आया) आवश्यकता आहे. संपर्क- ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६.
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सअॅपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.
- IRCED **मायक्रो फायनान्स कंपनीसाठी वावे, पेण, रोहा येथे** महिला कर्ज अधिकारी नेमणे आहे. विवाहित महिलांना प्राधान्य. दुचाकी आवश्यक. संपर्क ८३२९५५१११९१/८६०५२०४२१६

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही श्री. कैरस शवक दादाचांजी, (यापुढे मालक म्हणून संबोधित केलेले), ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या व यापुढे ‘सदर मिळकती’ असे संबोधण्यात आलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत, त्या मिळकतींचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या व्यक्तीचा/व्यक्तींचा/व्यक्तीसमुहाचा/कंपनी/भागीदारी संस्था/एलएलपी/बँक/वित्तीय संस्था यांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही व सदर मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतींचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड, दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुपग्रामपंचायत झिराडचे हद्दीतील मौजे झिराड येथील खालील वर्णनाच्या एकजिनसी, खुल्या व खुद्द मिळकती.

| अनु क्र. | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १) | १२५ | ०-१५-०० पो. ख. ०-०४-०० ०-१९-०० पैकी ० हे. १२ आर पोट खराब्यासह, आकार ० रूपये १६ पैसे एवढी मिळकत. | ०.३० |
| २) | २४५ | १-०२-३० ०-२४-०० १-२६-३० पो. ख. ०-३०-८० १-५७-१० पैकी १ हे. ५२.१० आर पोट खराब्यासह, आकार २३ रूपये ०५ पैसे एवढी मिळकत. | २४.०० |
| ३) | २४६ | ०-१२-०० पो. ख. ०-०१-०० ०-१३-०० | ०.२५ |
| ४) | २४७/१ | ०-३६-०० पो. ख. ०-०५-०० ०-४१-०० | ०.८० |
| ५) | २४८ | ०-८८-०० ०-३६-४० १-२४-४० पो. ख.०-१०-९० १-३५-३० पैकी ० हे. ७.५० आर, आकार ० रूपये ९५ पैसे एवढी मिळकत. | १५.७० |


अलिबाग
तारीख : १/१०/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
‘श्रुतीसारंग’ को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# भारताची ऐतिहासिक कामगिरी

## कसोटी क्रिकेटच्या इतिहासात विक्रमी धावांची नोंद

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**
**रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ कसोटी क्रिकेटमध्ये कहर करत आहे. एवढं की याच्यापुढे इंग्लंडची प्रसिद्ध 'बेझबॉल' शैली देखील फेल ठरली आहे. बांगलादेशविरुद्धच्या कानपूर कसोटीतील पहिल्या डावात भारताने अशी फलंदाजी केली आहे की, जी इतिहासात यापूर्वी कधीच झाली नव्हती. भारताने या डावात सर्वात वेगवान ५० धावा, सर्वात वेगवान १०० धावा, सर्वात वेगवान १५० धावा, सर्वात वेगवान २०० धावा आणि सर्वात वेगवान २५० धावांचा विक्रम मोडला आहे. आता कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वात वेगाने या धावांचा टप्पा गाठण्याचा विक्रम भारतीय संघाच्या नावे झाला आहे.**



### तेंडुलकरचा 'विराट' विक्रम मोडला

**या सामन्यात विराट कोहलीने अवघ्या ३५ चेंडूत ४७ धावा ठोकल्या आहेत. याचबरोबर विराट कोहलीने ५९४ सामन्यांत २७ हजार आंतरराष्ट्रीय धावांचा टप्पा ओलांडून सचिन तेंडुलकरचा (६२३ सामने) विश्व विक्रम मोडला आहे. त्याने ११४ कसोटीत ८ हजार ८७१ धावा, २९५ एकदिवसीय सामन्यांत १३ हजार ९०६ धावा आणि १२५ टी-२० सामन्यांत ४ हजार १८८ धावा केल्या आहेत.**



३ षटकांत ५० धावा
१०.१ षटकांत १०० धावा
१८.२ षटकांत १५० धावा
२४.२ षटकांत २०० धावा
३०.१ षटकांत २५० धावा

भारताने दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावाता ९ बाद २८५ धावा करून डाव घोषित केला. कानपूर कसोटीचे अडीच दिवस पावसामुळे वाया गेले. यानंतर चौथ्या दिवशी बांगलादेशचा पहिला डाव २३३ धावांवर गुंडाळला गेला. बांगलादेशकडून मोमिनूल हकने १९४ चेंडूंत १०७ धावांची नाबाद खेळी केली. पण, संपूर्ण संघ २३३ धावांत तंबूत परतला. बुमराहने ३ बळी तर सिराज, आकाश दीप व अश्विन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

प्रत्युत्तरात मैदानावर उतरलेल्या भारताने ५२ धावांची आघाडी घेत डाव घोषित केला. यात यशस्वी जयस्वालने (५१ चेंडूत ७२ धावा) प्रथम कर्णधार रोहित शर्मासह (११ चेंडूत २३ धावा) तुफानी सलामी दिली. यानंतर विराट कोहली (३५ चेंडूत ४७ धावा) आणि केएल राहुल (४३ चेंडूत ६८ धावा) यांनी ही लय कायम ठेवली. शुबमन गिलने देखील ३६ चेंडूत ३९ धावांचे योगदान दिले. अखेरीस आकाशदीपने ५ चेंडूत १२ धावा ठोकल्या. अशाप्रकारे भारतीय संघाने अवघ्या ३४.४ षटकांत २८५ धावा ठोकल्या. चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत बांगलादेशने त्यांच्या दुसऱ्या डावात २६ धावांवर दोन गडी गमावले होते. ते भारतीय संघाच्या पहिल्या डावातील आघाडीपासून अजूनही २६ धावा मागे आहेत.

### जैस्वालची 'यशस्वी' खेळी

**या सामन्यात रोहित बाद झाल्यानंतर जैस्वालने गिलबरोबर फलंदाजी करताना आक्रमक खेळ सुरू ठेवला होता. जैस्वालने गिलबरोबरच्या भागीदारीदरम्यान त्याचे अर्धशतकही पूर्ण केले. त्याने अवघ्या ३१ चेंडूत त्याचे अर्धशतक पूर्ण केले. यामुळे भारताकडून हे कसोटीतील चौथ्या क्रमांकाचे सर्वात जलद अर्धशतक ठरले आहे. पण अर्धशतकानंतर तो ५१ चेंडूत ७२ धावा करून बाद झाला. या खेळीत त्याने १२ चौकार आणि २ षटकार मारले आहेत.**

### जडेजाचा विक्रमी बळी

**या सामन्यात भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजाने मोठे विक्रम केले आहेत. बांगलादेशचा शेवटचा बळी जडेजाने घेतला. त्याने ७५ व्या षटकात आपल्याच गोलंदाजीवर खलीद अहमदचा झेल घेत बांगलादेशचा डाव संपवला. जडेजासाठी हा बळी विक्रमी ठरला आहे. कसोटी कारकिर्दीतील हा ३०० वा बळी ठरला आहे. तसेच, कसोटीमध्ये ३०० बळी घेणारा तो भारताचा सातवा गोलंदाज ठरला आहे. जडेजा सर्वात कमी चेंडू टाकून ३०० बळी घेणारा भारताचा दुसरा गोलंदाज तर पहिल्या क्रमांकावर आर अश्विन आहे.**

# आयर्लंडचा अफ्रिकेवरील पहिलाच विजय

**। अबू धाबी । वृत्तसंस्था ।**

आयर्लंडने टी-२० क्रिकेटमध्ये रविवारी ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. दोन सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या लढतीत त्यांनी बलाढ्य दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले आहे. आयर्लंड संघाचा हा आफ्रिकेवरील पहिलाच विजय ठरला आहे.



अबू धाबी येथे रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी दक्षिण आफ्रिका विरूद्ध आयर्लंड असा टी-२० सामना झाला. या सामन्यात आयर्लंडने विजय मिळवून मालिका १-१ अशी बरोबरीत रोखली. या सामन्यात आयर्लंड बंधू चमकले. यात रॉस एडरने शतक लगावत आयर्लंडसाठी मोठी धावसंख्या उभारली, तर त्याचा भाऊ मार्क एडरने ४ बळी घेत आफ्रिकेची फलंदाजी उद्धवस्त केली.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. आयर्लंडचे सलामीवीर पॉल स्टर्लिंग व रॉस एडर यांनी धमाकेदार फलंदाजीने सुरूवात केली होती. त्यांनी पहिल्या विकेटसाठी १३७ धावांची भागीदारी केली. कर्णधार स्टर्लिंगला ५२ धावांवर माघारी परतला. रॉसने ५८ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले. एडर १०० धावांवर बाद झाला. त्यांना २० षटकांत ६ बाद १९५ धावा उभारता आल्या.

दक्षिण आफ्रिकेने १९६ धावांचा पाठलाग करताना चांगली सुरूवात केली. परंतु, रायन रिकेल्टन ३६ धवांवर बाद झाला. यानंतर आलेल्या मॅथ्यू ब्रीत्झके आणि रिझा हेंड्रिक्स या दोघांनी वैयक्तिक अर्धशतक झळकावताना संघाला विजयाच्या दिशेने नेले होते. पण, एडरने ४ बळी घेतले आणि त्याला ग्रॅहम हुमची (३ बळी) साथ मिळाली. आफ्रिकेला ९ बाद १८५ धावाच करता आल्या.



जिल्हा क्रीडा अधिकारी आणि सेंट मेरी कॉन्व्हेन्ट हायर सेकंडरी स्कुल यांच्यावतीने अलिबाग तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेवेळी धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलच्या मैदानावर सुरु असून १४, १७ आणि १९ वर्षखालील शालेय विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत.

# ब्रूकने मोडला 'विराट' विक्रम

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया वि. इंग्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत पाहुण्या संघाने इंग्लंडला मागे टाकत मालिकेवर कब्जा केला आहे. दरम्यान, मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी इंग्लंडचा कर्णधार जॉस बटलर दुखापतीमुळे बाहेर पडला होता. त्याच्या जागी युवा खेळाडू हॅरी ब्रूकला संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्याने देखील संधीचा फायदा घेत लौकीकास साजेल अशी कामगिरी नक्कीच केला आहे. वयक्तीक काम गिरी म्हणून त्याने 'विराट' विक्रम रचला आहे. वास्तविक, कर्णधार म्हणून ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकाच मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड हा विराट कोहलीच्या नावे होता.



विराट कोहलीने २०१९ मध्ये झालेल्या एकदिवसीय मालिकेत धावांचा पाऊस पाडत ३१० धावा केल्या होत्या. आता हॅरी ब्रुकने हा रेकॉर्ड मोडून काढला आहे. हॅरी ब्रुकने इंग्लंडकडून ३१२ धावा केल्या आहेत.

# द्रविडच्या मुलाला मोठा धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय माजी क्रिकेटपटू राहुल द्रविड यांचा मुलगा समित द्रविड याला मोठा धक्का बसला आहे. दुखापतीमुळे सोमवारपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताच्या दोन अंडर-१९ चार दिवसीय सामन्यांपासून समित द्रविड दूर राहू शकतो. समितला अंडर-१९ स्तरावर खेळण्याची ही शेवटची संधी आहे. तो ११ ऑक्टोबर रोजी १९ वर्षांचा होईल आणि २०२६ चा आयसीसी अंडर-१९ विश्वचषक खेळू शकणार नाही. दुसरा चार दिवसीय सामना ७ ऑक्टोबरपासून चेपॉक येथे खेळवला जाणार आहे. उजव्या हाताने फलंदाजी करण्यासोबतच समित द्रविड मध्यमगती गोलंदाजीही करतो. परंतु, समित द्रविड सध्या



गुडघ्याच्या दुखापतीने त्रस्त असून तो सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आहे. समित द्रविडचे पुद्दुचेरीतील भारतीय अंडर-१९ संघात पदार्पण निश्चित वाटत होते. परंतु, तो एकदिवसीय सामने खेळू शकला नाही. मुख्य प्रशिक्षक ऋषिकेश कानिटकर यांनी सांगितले की, तो सध्या एनसीएम ध्ये आहे आणि गुडघ्याच्या दुखापतीतून सावरत आहे. आत्ताच काही सांगू शकत नाही. पण चार दिवसीय सामन्यांच्या मालिकेत खेळणे अवघड आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धा उत्साहात

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

चॅम्पियन्स कराटे क्लब रायगड तर्फे राज्यस्तरीय कराटे स्पर्धा श्रीवर्धन येथील कुलकर्णी सभागृहात संपन्न झाली. या स्पर्धेत रायगड, पुणे, ठाणे, मुंबई, सातारा, सांगली, कोल्हापूर अशा जिल्ह्यातील साधरण २०० मुला-मुलींनी सहभाग नोंदविला होता. चॅम्पियन्स कराटे क्लबचे संस्थापक संतोष मोहिते यांच्या मार्गदर्शन खाली होणाऱ्या या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मधुकर ढवळे, नॅशनल हॉली बॉल प्लेअर अजित मापुस्कर तसेच ॲड. संतोष साप्ते उपस्थित होते. यावेळी साऊथ एशियन गोल्ड मेडलिष्ट कुमार प्रसाद अवघडे यांचा सत्कार करण्यात आला. कराटे स्पर्धेत वेगवेगळ्या गटात अव्वल ठरलेल्या गटातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, रायगड जिल्ह्याकडून खेळणाऱ्या विक्रांत खांडेकर, विहान विचारे, रूजुला यवतकर, मृदूनी जोशी या खेळाडूंचा आकर्षक चषक आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. सिनियर गटात शंतनु जाधव आणि साक्षी तांडलेकर हे खेळाडू अव्वल ठरले आहेत.



# बांगलादेशचा टी-२० संघ जाहीर

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध बांगलादेश यांच्यात सध्या कसोटी मालिकेतील दुसरा आणि अंतिम सामना कानपूर येथे खेळवण्यात येत आहे. यानंतर उभयसंघात ३ सामन्याची टी-२० मालिका होणार आहे. बीसीसीआयने २८ सप्टेंबर रोजी या मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर केला. बीसीसीआयनंतर आता २४ तासांनी बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टी-२० मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे.

यावेळी नजमुल हुसेन शांतो याने बांगलादेशच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळणार आहे. शांतोच्या नेतृत्वात बांगलादेशने टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत सुपर ८ पर्यंत मजल मारली होती. तर, शाकिब अल हसन याने कसोटीसह टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. यामुळे शाकिबच्या जागी मेहदी हसन मिराज याला संधी देण्यात आली आहे. मेहदीचे १ वर्षाने टी-२० संघात पुनरागमन झाले आहे. सौम्य सरकार याला वगळण्यात आले असून परवेज हुसेन इमोन आणि रकीबुल हसन या दोघांचे पुनरागमन झाले आहे.

बांगलादेश संघात नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), लिटन दास, मेहदी हसन मिराज, तस्कीन अहमद, तंजीद हसन, परवेज होसैन इमोन, तॉहीद हृदॉय, झाकेर अली, महेदी हसन, रिशाद होसैन, मुस्तफिजुर रहमान, शोरीफुल इस्लाम, तंजीम हसन साकिब, रकीबुल हसन आणि महमुदुल्लाह यांचा समावेश आहे.

# कराटे स्पर्धेत रायगड जिल्हा द्वितीय

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

जपान कराटे असोसिएशन इंडियाच्यावतीने विभागीय स्तरावर कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा साताऱ्यातील छत्रपती शिवाजी महाराज शाहू स्टेडियम येथे रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. या विभागीय स्पर्धेत सातारा, रायगड, नांदेड, पुणे, कराड, धुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी रायगड जिल्ह्यातील ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी एकूण ५७ पदकांची




कमाई केली असून यामध्ये काता, कुमिते या कराटे प्रकारात १८ सुवर्ण, १३ रौप्य, २६ कांस्यपदकांची कमाई केली आहे. विभागीय स्तरावरील कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत पवित्रा, अवनी, पूर्वा, निधी, क्रीशिव यांनी अमर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पदकांची कमाई केली आहे. त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र संघात नाशिककरांची निवड

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)ने २०२४-२५ हंगामासाठी महाराष्ट्र संघाची घोषणा केली आहे. राज्याच्या संघात नाशिकच्या सत्यजित बच्छाव, मुर्तुझा ट्रंकवाला यांना स्थान मिळाले आहे, तसेच मुळचा नाशिककर असलेला रामकृष्ण घोष याचीही संघात निवड झाली आहे.

डावखुरा फिरकीपटू सत्यजित बच्छाव व सलामीचा फलंदाज मुर्तुझा ट्रंकवाला अनुभवी रणजीपटू आहेत. रामकृष्णने मागील हंगामात रणजित पदार्पण केले. सत्यजितने महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारीही पार पाडली आहे. सत्यजित यंदाच्या महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये सर्वाधिक बळी घेत उत्कृष्ट गोलंदाज सन्मान 'पर्पल कॅप'चा मानकरी ठरला होता. त्याने एकूण २५ बळी टिपले होते. मुर्तुझा सलामीचा फलंदाज असून, महाराष्ट्र संघातर्फे बीसीसीआयच्या रणजी चषक स्पर्धेत २०२३-२४ च्या हंगामात त्याचे दमदार पुनरागमन झाले होते.

## वेस्ट इंडिजला २० धावांनी नमवले

# भारतीय महिलांचा विजयी सराव

**। दुबई । वृत्तसंस्था ।**
**युएईमध्ये सुरु होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकामध्ये भारतीय सामन्यांना ४ ऑक्टोंबरपासून सुरूवात होणार आहे. याआधी सराव सामने खेळवले जात आहेत. भारतीय महिला संघानेही रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी पहिला सराव सामना खेळला. ज्यामध्ये भारतीय संघाने वेस्ट इंडिजचा २० धावांनी पराभव केला आहे.**



वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून भारतीय संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. मात्र, भारतीय संघाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. सलामीवीर शेफाली वर्मा ७ धावा तर स्मृती मानधना १४ धावा करून बाद झाली. यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरही केवळ १ धावा करून बाद झाली. यानंतर जेमिमाह रॉड्रिग्ज आणि यास्तिका भाटिया यांनी डाव सांभाळला. रॉड्रिग्जने ४० चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने ५२ धावांची खेळी केली. यास्तिका भाटियाने २५ चेंडूत २४ धावा केल्या. त्यामुळे संघाला १४१ धावांपर्यंत मजल मारण्यात यश आले.

लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची सुरुवात खूपच खराब झाली. संघाने केवळ १३ धावांत ३ गडी गमावले. यानंतर शिनेल हेन्रीने मधल्या फळीत डावाची धुरा सांभाळली. हेन्रीने ४८ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ५९ धावांची खेळी केली. मात्र, तिला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. एफी फ्लेचरने खालच्या क्रमाने २१ धावा केल्या पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. याच कारणामुळे वेस्ट इंडिज संघाला पराभवाचा सामना करावा लागला. भारतीय संघाकडून पूजा वस्त्राकरने ४ षटकात १ मेडनसह २० धावांत ३ बळी घेतले. याशिवाय दीप्ती शर्मानेही ३ षटकांत ११ धावा देत २ बळी घेतले.

# पुरनचे कर्णधार पदाला आव्हान

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमिअर लीगच्या पुढील पर्वासाठी बीसीसीआयने रिटेन्शन नियम जाहीर केले आहेत. यात सहा खेळाडूंना संघात कायम राखण्याची परवानगी सर्व फ्रँचायझींना मिळाली आहे. पण, त्यात एक अनकॅप्ड खेळाडू असायला हवा आणि यामुळे सहा खेळाडू रिटेन केल्यास फ्रँचायझीच्या पर्समधून ७९ कोटी रुपये वजा होतील. आता खेळाडूंना कायम ठेवा अन् पैसेही वाचवा अशा गणितांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. यात लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधाराच्या भवितव्याची चर्चा रंगली असून अशातच एक फलंदाज टी-२० मैदान गाजवून त्याच्या कर्णधार पदाला आव्हान देत आहे.

कॅरेबियन प्रीमिअर लीग २०२४ मध्ये त्रिनबागो नाइट रायडर्सकडून



खेळणाऱ्या निकोलस पूरनचा फॉर्म हा वेगळ्याच उंचीवर सुरू आहे. त्याने रविवारी गयाना ॲमेझॉन वॉरियर्सच्या गोलंदाजांची धुलाई करून शतक झळकावले आहे. जेसन रॉय आणि पूरन यांनी १५२ धावांची सर्वोत्तम भागीदारी केली आहे. रॉय २६ चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह ३४ धावांवर बाद झाला. पूरनने मोर्चा सांभाळताना ५९ चेंडूंत ९ चौकार व ८ षटकारांसह १०१ धावांची खेळी केली.

लखनौ सुपर जायंट्सने आयपीएल २०२४ मध्ये निकोलस पूरनसाठी १६ कोटी रुपये मोजले होते. त्याने आयपीएलचा हे पर्व गाजवले आणि आता केएल राहूलच्या जागी त्याला कर्णधार करतील अशी चर्चा सुरू आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)